CMYK




# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक १०३ वा फोन २३०१०१ दिनांक १३ मार्च २०२६ शुक्रवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

डॉक्टर, कर्मचाऱ्यांचा जबाब जुळत नाही | प्रसुतीनंतर वेळोवेळी मॉनिटरींग केली नाही | स्त्री रोग तज्ञ, नर्स यांच्यात अनुभव व गांभिर्याचा अभाव | पेशंट सीरियस झाल्याची माहिती वरिष्ठांना दिली नाही | रक्ताची व्यवस्था करण्यासाठी तब्बल १ तास उशीर झाला

## एवढे सगळं चौकशीत आलयं तरी समिती म्हणते कुठलाही हलगर्जीपणा नाही

# छाया पांचाळ मृत्यू प्रकरणाचा अहवाल डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना वाचविण्यासाठीच तयार केला आहे का?

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- जिल्हा रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या छाया गणेश पांचाळ (रा.अंबीलवडगाव ता.बीड) या महिलेचा प्रसुतीनंतर रक्तस्त्राव झाल्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना १३ एप्रिल २०२५ रोजी घडली होती. सदरील प्रकरणावरुन संबंधीत डॉक्टर्स, नर्स यांच्याविरुद्ध प्रचंड रोष व्यक्त करण्यात आला होता. त्यांच्या निष्काळजीपणामुळेच छाया पांचाळ यांचा मृत्यू झाल्याचा आरोप करत सर्व स्तरातून जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. अखेर या प्रकरणात बाहेरच्या जिल्ह्यातील वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी आणि शल्यचिकित्सकांची समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल देखील समोर आला आहे. मात्र या अहवालातून संबंधीत समिती डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत की काय? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. छाया पांचाळ प्रकरणात जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर्स आणि स्टाफ नर्सकडून गंभीर चुका झाल्याचे समोर आलेले आहे. तब्बल ८ मुद्यामधून समितीने डॉक्टर्स, नर्स यांच्या कारभाराचे वाभाडे काढले आहेत. मात्र शेवटी सदरील मृत्यू प्रकरणात डॉक्टरांचा कुठलाही हलगर्जीपणा दिसून येत नाही असा निष्कर्ष काढून समितीने हा अहवाल संबंधीत डॉक्टर्स आणि नर्स यांना वाचविण्यासाठीच तयार केल्याचा संशय व्यक्त होत आहे. पान २ वर

### प्रसुती विभागातील कर्मचाऱ्यांनी पैशाची मागणी केल्याचे मान्य पण ते समितीच्या कक्षेत का येत नाही?

बीड जिल्हा रुग्णालयातील छाया पांचाळ मृत्यू प्रकरणात चौकशी समितीने दिलेल्या अहवालात मुद्दा क्रमांक १० मध्ये मयत रुग्णाच्या सांगण्यानुसार प्रसुती विभागातील वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांनी पैशाची मागणी केली असा उल्लेख आहे परंतु सदरील बाब या समितीच्या कक्षेत येत नाही, असे सांगून चौकशी समितीने हात वर केले आहेत. यातून कर्मचाऱ्यांनी पैशाची मागणी केल्याचे समितीने मान्य केले परंतु त्यास आम्ही काही करु शकत नाही असे हतबलपणे नमूद केले, ही बाब अतिशय गंभीर आणि संबंधीत चौकशी समितीच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करणारी आहे.

### समितीने सर्वांना दोषी ठरवले अन् म्हणतात कारवाई करु नका

छाया पांचाळ मृत्यू प्रकरणात आरोग्य अधिकाऱ्यांच्या समितीने केलेल्या चौकशी अहवालात संबंधीत डॉक्टर्स, नर्स हे दोषी असल्याचे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्यांच्या हातून ज्या काही गंभीर चुका या प्रकरणात घडल्या आहेत त्याचाही प्रत्येक मुद्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे. सदरील उल्लेख आणि नोंदी पाहता समितीने सर्वांनाच दोषी ठरविले, मात्र गंभीर समज द्या असे सांगून एक प्रकारे त्यांच्यावर कारवाई करु नका असेच सांगण्याचा प्रयत्न समितीने केला आहे. छाया पांचाळ या गरीब कुटुंबातील महिलेचा जीव गेला असतांना समिती मात्र एकमेकांना मिसळल्यासारखे त्यांच्या लोकांना वाचविण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असल्याचे दिसते.

## जीव वाचवण्यासाठी कुऱ्हाड वापरा, अन्याय सहन करू नका

ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके सर



### आरोपींना चार दिवसात अटक न झाल्यास माजलगाव पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्याचा इशारा

माजलगाव दि.१२ (प्रतिनिधी):- राज्यभरात मेंढपाळांवर होत असलेल्या हल्ल्यांच्या घटनांमुळे संताप व्यक्त करत ओबीसी नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी धनगर समाज बांधवांना अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले. महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार मेंढपाळांवर हल्ल्याच्या घटना घडत आहेत. माझे समाज बांधवांना आवाहन आहे की, आपल्या हातात ढाळा पाडण्यासाठी असलेली कुऱ्हाड गरज पडल्यास स्वतःचा जीव वाचवण्यासाठी वापरा. पान २ वर

### बीड जिल्हा परिषदेमध्ये सुनावणीच्या नावाखाली थातूरमातूर चौकशी

## सीईओ म्हणाले, जिल्ह्यात सर्वत्रच महिलांचा कारभार पुरुष पाहतात

# साहेब, सरकारच्या महिलाराजला तिलांजली का देता?

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीच्या कामात प्रचंड अशा प्रकारचा भ्रष्टाचार झाल्याची प्रकरणे रोज रोज नव्याने उघडकीस येत आहेत गावातील अनेक कामांच्या तक्रारी केल्यानंतर त्याची चौकशी ही बीड जिल्हा परिषदेमध्ये घेतली जाते. आज गुरुवारी सकाळ पासूनच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान यांच्या दालनासमोर सुनावणीसाठी मोठ्या प्रमाणात लोकांना चौकशीसाठी बोलावण्यात



आले होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्येक बाब तपासून घेणे गरजेचे असताना ज्यांनी तक्रार केली त्यांचीच उलट तपासणी करून ज्यांच्या विषयी तक्रार आहे त्या पंचायत समितीतील अधिकारी ग्रामसेवक विस्तार अधिकारी किंवा चौकशी समितीतील लोकांना पाठीशी घालण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी केले. अनेक सुनावणीत महिलांचा कारभार हे पुरुष करत असल्याच्या तक्रारी होत्या त्याचप्रमाणे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी असताना सुद्धा तक्रारदारालाच हे होतच असते असे म्हणत त्यांनी आपल्याच भ्रष्ट कर्मचाऱ्यांची बाजू घेतल्याचे काही तक्रारदारांनी बोलून दाखवले. यातून मकरंद अनासपुरे यांच्या चित्रपटातील एका डायलॉग ची आठवण येते या डायलॉगमध्ये "साहेब कायद्याचे बोला" असा तो डायलॉग होता त्याचाच प्रत्यय बीड जिल्हा परिषदेमध्ये अनेकांना आला. तक्रारीची कुठल्याही प्रकारची चौकशी न करता चौकशी पथकाने दिलेल्या अहवालावरच तो अत्यंत खरा आहे असे समजून तक्रार करणाऱ्याला हे होतच असते असे सल्लेही त्यांनी दिले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी काल सुनावण्या घेतल्या, पान २ वर



## बीडमध्ये १९ पथकांकडून २०३ ठिकाणी छापे २८ गॅस सिलेंडर जप्त, ३ प्रकरणात गुन्हा दाखल

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- जिल्हा पुरवठा विभागाने अवैध गॅस सिलेंडरांच्या पुरवठ्यावरून शहरात मोठी कारवाई केली आहे. गुरुवारी एकाच दिवशी २०३ ठिकाणी छापे टाकून २८ ठिकाणी गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले. तीन प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले असून उर्वरीत १० प्रकरणात रात्री उशिरापर्यंत गुन्हे पान २ वर



### बीडमध्ये तरुणाची आत्महत्या

## ११२ क्रमांकावर स्वतःच फोन करुन माहिती दिली अन् गळफास घेतला



बीड दि.१२ (प्रतिनिधी):- मी आत्महत्या करत आहे असा फोन ११२ या आपत्कालीन क्रमांकावर करुन संबंधीत तरुणाने गळफास घेऊन जीवन संपविल्याची घटना शहरातील तेलगाव नाका भागातील पापनेश्वर मंदिर परिसरात गुरुवारी सायंकाळी घडली. पान २ वर

फोर व्हीलरसाठी
लेडीज/महिला
ड्रायव्हर पाहिजे
:: संपर्क ::
9422240593
16583




प्रथमच बीड शहरामध्ये
प्रसिध्द कॅन्सर विकार तज्ञ
डॉ.अमोल कोटलवार
यांची भेट शनिवार दि.१४ मार्च २०२६ रोजी



MBBS, MD (Medicine),
DM (Medical Oncology),
MRCP (UK), ECMO, FCPM, PDCR, Thoracic Oncology (USA) Consultant Medical & Hemato-Oncologist
Mob.: 9727755847
संजीवनी
मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
वैद्यनाथ प्लाझा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड ४३११२२
ओ.पी.डी.: दुपारी १२ ते ३०
खालील लक्षणे आढळून येणाऱ्या नागरिकांनी संपर्क साधावा
१) न भरुन येणारी जखम ओठ, जीभ, कातडी
२) कोठेही असणारी गाठ स्तन, गळा, चामडी
३) कोठूनही होणार अनियमित रक्तस्त्राव नाक, थुंकी, उलटी लाल-पांढरा पदर जाणे, आव, शौच वगैरे
४) अन्न गिळताना अडकणे, भूक मंदावणे, वजन घटणे, उलटे, उलटी होणे
५) संडास व लघवी यांच्या सवयीत बदल
६) आवाजात बदल, सतत खोकला येणे
७) तीळ, चामखीळ यात बदल होणे अगर चिघळणे
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध
मोफत उपचार
• सर्व शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे
• सर्व प्रकारचे मुतखडे
• प्रोस्टेट ग्रंथीची शस्त्रक्रिया
• मुत्रमार्गाचे आजार
• किडनीचे आजार व त्यामध्ये सर्व प्रकारचे शोषणाचे आजार
लहान मुलांचे आजार व शस्त्रक्रिया
मोफत उपचार हाडांच्या आणि मणक्याच्या सर्व शस्त्रक्रिया उपलब्ध
नोंदणीसाठी संपर्क : 02442 - 225678
: अधिक माहितीसाठी संपर्क :
9066411414

CMYK

# कामगारानेच मारला सराफा दुकानातील दागिने व रोकडवर डल्ला




**✼ वडवणीतील सुरज ज्वेलर्स दुकानात घडली घटना**

**✼ आरोपीविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

वडवणी, दि.१२ (प्रतिनिधी):- वडवणी येथील मेन रोडवर असलेल्या विनय माणिकचंद नहार यांच्या सुरज ज्वेलर्स नामक सराफा दुकानातील कामाला असलेल्या अमोल सुभाष चव्हाण रा.कान्हापूर तांडा, या.वडवणी नामक कामगाराने चक्क आपल्याच मालकाच्या दुकानात हात साफ केला असून त्याने तब्बल ५ लाख २७हजार २०० रुपयांची दागिने व रोख ५० हजार रुपये अशा एकूण ५ लाख ७७ हजार २०० रुपयांची चोरी केली असल्याची घटना दि.१४ जानेवारी २०२६ रोजी उघडकीस आली आहे. याप्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात काल गुरुवारी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली असून जर दुकानातील कामगार नौकरच जर असे मालकाच्या विश्वासाला व स्वतःच्या प्रामाणिकपणाला कलंकित करत असतील तर मालक कोणाच्या भरवशावर दुकान चालवतील हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

वडवणी शहरातील नामांकित असलेल्या सुरज ज्वेलर्स सराफा दुकानचे मालक विनय माणिकचंद नहार यांनी गुन्हा दाखल करतांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, माझे वडवणी शहरात सुरज ज्वेलर्स नावाचे सराफा दुकान असुन ते मागील २० ते २५ वर्षांपासून चालवतो. माझ्या सोन्याचे दुकानात सुनिल निपटे व अमोल सुभाष चव्हाण रा.कान्हापुर तांडा ता.वडवणी हे मागील दोन वर्षापासून कामास आहेत. माझ्या दुकानात सोन्या-चांदीचे दागिने विक्रीसाठी असतात व ग्राहकांच्या मागणी प्रमाणे तयार करुन देण्यात येतात. ग्राहकांना त्यांचे मागणी व आवडीप्रमाणे सोने-चांदीचे दागिने दाखविण्याचे काम दुकानातील नोकर करतात. दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजेच्या दरम्यान एका ग्राहकाने दागिने खरेदी केले व त्यानंतर आम्ही दुकानातील सोने-चांदीच्या दागिणे साहित्याची आवराआवर केली व दिवसभरामध्ये सोने-चांदीचे दागिने विक्री होवून आलेली रोख रक्कम ३ लाख रुपये दुकान बंद करतांना नेहमीप्रमाणे दुकानातील स्ट्राँग रुम तिजोरीमध्ये सोनेचांदीच्या दागिन्यासह ठेवून दुकान बंद करण्यात आली व आम्ही सर्व घरी निघून गेलो. दि. १४ जानेवारी २०२६ रोजी सक्रांत सणाच्या दिवशी नेहमीप्रमाणे सकाळी ९ वाजेच्या दरम्यान दुकान उघडण्यात आले व तिजोरीतील साहित्य बाहेर काढले व शोकेसमध्ये ठेवण्यात आले. त्यासोबतच ठेवलेली रक्कम ३ लाख रुपये तिजोरीतून काढून कांऊटरमध्ये ठेवण्यात आली व दुकानाची साफसफाई झाल्यानंतर काही वेळाने मी जमा रक्कम तपासली असता त्यामधील पन्नास हजार रुपये कमी असल्याची माझी खात्री झाल्यानंतर दुकानातील नौकरांना या बाबत विचारणा केली असता त्यांनी माहित नसल्याचे सांगितले. नंतर सीसीटीव्ही कॅमेरे रेकॉर्डिंग चेक केले त्यामध्ये आमचे दुकानातील कामगार अमोल सुभाष चव्हाण याने काऊंटरमध्ये ठेवलेल्या ३ लाख रुपयांपैकी पन्नास हजार रुपये चोरी केले असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. तसेच त्याचबरोबर दुकानात तो इतर साहित्याची चोरी करत असतांना सीसी टीव्हीमध्ये दिसून आला. त्यावर सर्व माल तपासला असता त्यामध्ये कानातील सोन्याचे टाप्स तीन जोड ७.९५० ग्रॅम वजनाचे ज्याची किंमत १ लाख २७हजार २०० रुपये, सोन्याचा हार ३१.८५० ग्रॅम वजनाचे ज्याची किंमत ४ लाख रुपये व रोख पाचशे रुपयांच्या १०० नोटांचे बंडल ५० हजार रुपये असे वरील वर्णनाचे एकूण ५ लाख ७७हजार २०० रुपयांचे सोन्याचे दागिने व नगदी रुपये माझ्या दुकानात काम करणारा नोकर अमोल सुभाष चव्हाण याने चोरी केले आहेत. तसेच वर नमूद चोरी केलेल्या वर्णना व्यतिरिक्त दुकानातील सोन्याचे दागिने चांदीची साखळी ३० ग्रॅम वजनाची किंमत ७हजार ५०० रुपये, सोन्याचा लेडीज गळ्यातील पॅन्डल ३.५० ग्रॅम वजनाचे किंमत ४९ हजार रुपये, नाकनातील सोन्याचा गुंड ०.२५० मिली किंमत ३ हजार ५०० रुपये, सोन्याची अंगठी २ ग्रॅम वजनाची किंमत २९ हजार रुपये, सोन्याची अंगठी १.५० ग्रॅम वजनाची किंमत २१ हजार रुपये, व नगदी चोरी केलेले ८२ हजार रुपये असे हे देखील दागिने व रोख रक्कम अमोल सुभाष चव्हाण यानेच चोरी केलेली आहेत. याच्या बदल्यात त्याने रोख ९९ हजार रुपये आणि ऑनलाईन व रोख ४३ हजार रुपये हे वापस दिलेले आहेत. परंतू उर्वरीत सोन्याचे दागिने व नगदी रुपये मागितले असता आज देतो, उद्या देतो असे म्हणून माझ्यावर केस करु नका अशी विनंती केली होती. मात्र त्याने पूर्णपणे घुमजाव केल्याने दि.१२ मार्च २०२६ रोजी विनय माणिकचंद नहार यांच्या फिर्यादीवरुन आरोपी नौकर अमोल सुभाष चव्हाण रा.कान्हापूर तांडा, या.वडवणी याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ३ लाख कर्मचाऱ्यांची कुंडली तपासणार

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी):- राज्यातील शिक्षण क्षेत्रात मोठी हालचाल सुरू झाली असून शालार्थ आयडीमध्ये झालेल्या कथित बनावटगिरीची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक म्हणजेच एसआयटी कार्यरत झाले आहे. या प्रकरणात सुमारे ३ लाख शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची माहिती तपासली जाणार असल्याने प्रशासनाने गंभीर पावले उचलली आहेत. पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली असून त्यामध्ये पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि शिक्षण सहसंचालक हारुन आत्तार यांचा समावेश आहे. या समितीला सुरुवातीला तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र ७ नोव्हेंबर २०१२ ते ७ जुलै २०२५ या कालावधीत नियुक्त झालेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची संपूर्ण माहिती गोळा करण्यात विलंब झाला. त्यामुळे सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी अधिक वेळ लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी एसआयटीने राज्य शासनाकडे अतिरिक्त तीन महिन्यांची मुदत मागितली आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व खासगी अनुदानित शाळांमध्ये १८ नोव्हेंबर २०१६ ते ७ जुलै २०२५ या कालावधीत नियुक्त झालेल्या आणि शालार्थ आयडीद्वारे वेतन घेणा-या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यामध्ये संबंधित कर्मचा-यांचे वैयक्तिक मान्यता आदेश, शालार्थ आयडी संदर्भातील आदेश, शाळा व्यवस्थापनाचा नियुक्ती आदेश तसेच रुजू झाल्याचा अहवाल यांचा समावेश आहे. तसेच ७ नोव्हेंबर २०१२ ते १८ नोव्हेंबर २०१६ या काळातील नियुक्त्यांची कागदपत्रेही तपासणीसाठी मागवण्यात आली आहेत.

समितीतील वरिष्ठ अधिकारी त्यांच्या इतर जबाबदा-यांमुळे व्यस्त असल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागातील उपसंचालक आणि सहसंचालक दर्जाचे अधिकारी विभागीय स्तरावर सर्व कागदपत्रांची सविस्तर तपासणी करणार आहेत. त्यानंतर प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालकांकडून अंतिम पडताळणी केली जाईल. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एसआयटी समिती अंतिम अहवाल तयार करून राज्य सरकारकडे सादर करणार आहे. दरम्यान, अनेक शाळांकडून अजूनही काही कर्मचा-यांची माहिती अपलोड करण्यात आलेली नसल्याचे समोर आले आहे. प्राथमिक शाळांमधील ७०९ आणि माध्यमिक शाळांमधील २०८७ अशा एकूण २७९६ कर्मचा-यांची माहिती प्रणालीमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे संबंधित शाळांना पुन्हा सूचना देण्यात आल्या आहेत. उपलब्ध आकडेवारीनुसार प्राथमिक शिक्षण विभागात ४८८९८ तर माध्यमिक शिक्षण विभागात २५१९८७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. दोन्ही मिळून एकूण २,९५,८८५ कर्मचा-यांची माहिती तपासली जाणार आहे.

पान १ वरून

### छाया पांचाळ मृत्यू प्रकरणाचा अहवाल

बीड जिल्हा रुग्णालयात दि.१३ एप्रिल २०२५ रोजी छाया गणेश पांचाळ या महिलेचा प्रसुतीनंतर रक्तस्त्राव झाल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली होती. मात्र छाया पांचाळ यांचा मृत्यू डॉक्टर्स आणि नर्स यांच्या निष्काळजीपणामुळेच झाल्याची तक्रार करण्यात आली होती. या प्रकरणात छाया पांचाळ यांच्या मृत्युची चौकशी करण्यासाठी बाहेरच्या जिल्ह्यातील शल्यचिकित्सक आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. दि. २३ एप्रिल २०२५ रोजी समितीने बीड जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष भेट दिली होती. या समितीत धाराशिवचे शल्यचिकीत्सक डॉ.धनंजय चाकूरकर, उदगीरचे अतिरीक्त शल्यचिकित्सक डॉ.शशिकांत देशपांडे, औसा ग्रामीण रुग्णालयाच्या डॉ.सुनिता पाटील, उदगीर येथील सामान्य रुग्णालयाच्या स्त्री रोग तज्ञ डॉ.आरती वाडीकर यांचा समावेश होता. या समितीने प्रकरणाशी निगडीत अधिकारी, कर्मचारी तसेच तक्रारदार यांची सखोल चौकशी करुन जबाब नोंदविले. सदरील समितीने चौकशीअंती तीन पानांचा अहवाल दिला आहे. अहवालात छाया गणेश पांचाळ जिल्हा रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झाल्यापासून ते तिच्या दुर्दैवी मृत्यू पर्यंतच्या सर्व नोंदी स्पष्टपणे नमूद केल्या आहेत. त्यातून समितीने डॉक्टर, कर्मचाऱ्यांचा जबाब जुळून येत नाही

स्त्री रोग तज्ञ, नर्स यांच्या कामात गांभिर्याचा अभाव, रुग्ण गंभीर झाल्याचे डॉक्टरांनी वरिष्ठांना कळविले नाही, मयत रुग्णासाठी १ तास उशिराने रक्ताची व्यवस्था केली पण ते दिले किंवा नाही की वेस्ट केलेयाचीही नोंद नाही, रुग्ण सीरियस झाल्यावर डॉक्टरांच्या पेपरवरील नोंदी व निदान यामध्ये तफावत आढळते, मयत छाया पांचाळ यांच्या मृत्यू प्रकरणात संबंधीत अधिकाऱ्यांना गंभीर समज द्यावी, मयत रुग्णाच्या सांगण्यानुसार प्रसुती विभागातील कर्मचाऱ्यांनी पैशांची मागणी केली परंतु ही बाब समितीच्या कक्षेत येत नाही, वर्ग १ स्त्री रोग तज्ञाचा राऊंड झालेला दिसून येत नाही, सर्व स्टाफने रुग्णांशी सौजन्याने वागावे, डॉक्टर्स, स्टाफ, कर्मचारी यांच्यात समन्वय असणे गरजेचे, स्टाफ मॉनिटरींग काळजीपुर्वक करणे आवश्यक आहे असा निष्कर्ष काढला. एवढे सगळे निष्कर्ष काढल्यानंतर एकंदरीत मयत छाया गणेश पांचाळ यांचा मृत्यू हा सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सर्वतोपरी प्रयत्न करुन सुद्धा झाला आहे, तरी भविष्यात असे प्रकार घडू नये यासाठी संबंधीत अधिकाऱ्यांना गंभीर समज द्यावी असे एका मुद्यात नमूद केले आहे. एवढेच नव्हे तर सर्वात शेवटी सदरील मृत्यू प्रकरणात डॉक्टरांचा कुठलाही हलगर्जीपणा दिसून येत नाही, तथापि वर्ग-१ स्त्री रोग तज्ञाचा राऊंड झालेला दिसून येत नाही. स्टाफने रुग्णांशी सौजन्याने वागावे या मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही अपेक्षित असल्याचे समितीने म्हटले आहे. दरम्यान सदरील प्रकार अतिशय गंभीर असून चौकशी समितीच्या अहवालातील जवळपास सर्वच मुद्दे छाया पांचाळ मृत्यू प्रकरणाशी संबंधीत डॉक्टर्स आणि नर्स यांच्या विरोधात आहेत. कुठे ना कुठे नव्हे तर सर्वच बाबतीत डॉक्टर्स आणि नर्स यांच्या गंभीर चुका असल्याचे अहवाल आणि त्यातील निष्कर्षाचे मुद्दे पाहता आढळून येतात असा संशय आहे. तरीही त्यांच्या बाजुने दिलेला अहवाल अनेक प्रश्न उपस्थित करणारा आहे.

### जीव वाचवण्यासाठी कुऱ्हाड वापरा...

मी चिथावणी देत नाही, तर जबाबदारीने बोलत आहे, असे ठाम वक्तव्य त्यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन समोरील धरणे आंदोलनात केले.

माजलगाव तालुक्यात घळाटवाडी येथे काल मेंढपाळ बांधवांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके सर यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात जाऊन अधिकाऱ्यांची भेट घेतली. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली. पोलिसांचा धाक आरोपींवर राहिलेला दिसत नाही. समाजाच्या न्यायासाठी आवाज उठवणारे आम्ही बांगड्या भरलेल्या नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

दरम्यान, या घटनेत मारहाण झालेल्या बीटे बंधूंच्या कुटुंबीयांचीही त्यांनी भेट घेतली. कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना धीर दिला आणि न्याय मिळवून देण्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी उभे राहू, असा विश्वास दिला. यावेळी बीटे बंधूंच्या आजोबांनी आपल्या भावना व्यक्त करताना आमच्यावर अन्याय झाला तर आम्ही तो सहन करणार नाही, असे सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले.

प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अन्यथा धनगर समाजाच्या वतीने माजलगाव पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा प्रा. लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी चर्चा सुरू असून समाजातील नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. यावेळी माधवराव निर्मळ, शारदाताई पांढरे, माऊली सिरसट, पवण करवर, सुनिल ढाकणे, सुमंत धस, विलास नेमाने, अशोक ढोणे, विजय धाईगुडे, रामेश्वर शिंदे, किशोर पांचाळ, शंकर गावडे शामसुंदर पांचाळ दत्ता आबुज जगन्नाथ शिंदे, सह समाज बांधव या आंदोलनात सहभागी झाले होते.

**टी.सी.हरवला आहे**

**आदित्य नंदकिशोर उपरे**
याचा इयत्ता १० वीचा टी.सी. बीड ते नांदेड प्रवासात हरवला आहे.
सापडल्यास संपर्क साधावा
:: संपर्क ::
९८५००५७०१४
13467

### साहेब, सरकारच्या

### महिलाराजला तिलांजली का देता ?

या सुनावणीत जिल्हा परिषदेचे काही कर्मचारी आपल्या हात ओले करून घेताना दिसत असल्याच्या अनेकांच्या तक्रारी होत्या ग्रामपंचायतचे मुख्य उपमुख्य कार्यकारी अधिकारी काळे यांचे आपल्या कर्मचाऱ्यावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याचे दिसून आले. काळे यांना कुठल्याही प्रकरणाची माहिती दिल्यानंतर अगदी अर्ध्या तासाने त्यांना ती विचारली तर त्या गोष्टी लक्षात राहत नाहीत त्यामुळे ग्रामपंचायतमध्ये मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात सावळा गोंधळ निर्माण झाला आहे त्यातच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासमोर कुठलीही फाईल जाताना किंवा चौकशी करावयाचे असल्यास या चौकशीपूर्वीच तडजोड केली जाते अशा अनेकांच्या तक्रारी आहेत. सुनावणीच्या वेळी तक्रारदार आणि ज्यांच्या विरुद्ध तक्रार आहे हीच माणसे सुनावणीला असण्या अपेक्षित असताना महिला सरपंच जे पती किंवा उपसरपंचांचे पती हेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर उत्तरे देताना दिसून आले, एकंदरीत यापूर्वी कुठल्याही मुख्य कार्यकारी अधिकारी अशा प्रकारचा पायंडा पडला नव्हता, सुनावणीच्या काळात कोणीही बाहेरील माणूस आत जाऊन त्याची उत्तरे देतो हा प्रकार म्हणजे भ्रष्टाचारावर पांघरून घालण्याचा प्रकार आहे. जिल्हा परिषद मधील सुनावणी म्हणजे पैसे कमावण्याचे एक साधन झाले आहे, असे बोलले जाते. मात्र ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही किंवा आठवड्यात अनेक सुनावण्या घेऊन या सुनावणीतून कुठल्याही प्रकारच्या भ्रष्टाचारावर कार्यवाही होऊन लोकांना न्याय दिल्याचे दिसत नाही. जतिन रहेमान यांच्या विषयी सुरुवातीला जिल्ह्यात चांगल्या प्रतिमेचा अधिकारी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली होती मात्र आपल्याच अधिकाऱ्यांचे ऐकून कुठल्याही प्रकारची कार्यवाही न करता फक्त सुनावणी आणि चौकशी या पलीकडे कुठलाही कारभार सरकत नाही गेल्या अनेक दिवसात कुठल्याही भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर कठोर कारवाई करण्यात आलेली नाही गुरुवारी झालेल्या सुनावणीत अनेकांनी गावचा कारभार महिलांच्या ऐवजी त्यांचे घरातील मंडळी सर्व कारभार चालवत आहेत अशा प्रकारच्या तक्रारी आल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यात सर्वच ग्रामपंचायत मध्ये असा कारभार चालतो हे जाहीरपणे बोलून दाखवले त्यामुळे जतिन रहमान हे शासनाचे धोरण पुढे घेऊन जात आहेत की महिला राजला विरोध करत आहेत अशा प्रकारचा समज निर्माण होत आहे एकूणच बीड जिल्हा परिषदेमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी काळे हे कायमस्वरूपी दौरे आणि सुनावणीत व्यस्त असतात त्यांच्या काळात जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अगदी नाममात्र ही राबवले जात नाही ही शोकांतिका आहे जितिन रहमान यांनी अनेक प्रकरणात ग्रामपंचायतमध्ये भ्रष्टाचार झालेल्या वरती कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे.

### बीडमध्ये गॅस सिलेंडरसाठी २०३ ठिकाणी छापे ; २८ सिलेंडर जप्त

दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्वतः रस्त्यावर उतरून कारवाईचे नेतृत्व केले, ज्यामुळे व्यापारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. पुरवठा विभागाच्या विविध पथकांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत शहराच्या विविध भागांत छापे टाकले. एकूण २०३ ठिकाणी तपासणी केली असता, १३ ठिकाणी अवैधरित्या गॅस सिलेंडर साठवलेले आढळले. या कारवाईमुळे हॉटेल्स, चायनीज सेंटर्स आणि इतर खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई झाली. जप्त सिलेंडरांची किंमत लाखोंमध्ये असल्याचा अंदाज आहे, तर संबंधित दुकानदारांना नोटीस जारी करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी व्यापाऱ्यांकडून सिलेंडर ग्राहकांना कमी किंमतीत विकले जात असल्याचेही समोर आले आहे जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या थेट मार्गदर्शनात ही कारवाई पार पडली. त्यांच्यासोबत बीड नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, मंडळ अधिकारी अनील तांदळे, तलाठी शब्बीर पठाण, तालुका पुरवठा विभागातील अवल कारकून श्रीराम वायभट आणि संतोष मुळीक यांनी सक्रिय सहभाग घेतला. अधिकाऱ्यांनी सांगितले, की ही कारवाई उपभोक्ता संरक्षण आणि काळ्या बाजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी आहे. पुढील काळात अशा कारवाया वाढवण्यात येणार असून, तक्रारींवर तात्काळ कारवाई केली जाईल. या कारवाईमुळे बीड शहरातील अवैध गॅस व्यापारावर मोठा फटका बसला आहे. नागरिकांकडून पुरवठा विभागाचे कौतुक होत असून, व्यापाऱ्यांनी नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### बीडमध्ये तरुणाची आत्महत्या...

बीड शहरातील मोहम्मदीया कॉलनी येथील शेख आदम शेख महेमूद (वय २८ वर्ष) याने आत्महत्या करण्यापुर्वी ११२ या आपत्कालीन क्रमांकावर फोन करुन पोलिसांना मी आत्महत्या करत असल्याचे सांगितले. पोलिसांनी सदरील माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळी धाव घेतली मात्र तोपर्यंत शेख आदम याचा मृतदेह झाडावर लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून तशी कोणतीही सुसाईट नोटही प्राथमिक तपासात सापडली नसल्याचे समजते. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठविला. या प्रकरणी उशिरापर्यंत तपास सुरु होता.

पान ६ वरून

### आ.प्रकाशदादा यांची विधानसभेत मागणी

त्यांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा व गडकोट विकास महामंडळाची लवकरात लवकर स्थापना करावी, अशी विनंतीही आ. सोळंके यांनी यावेळी केली. महाराष्ट्राच्या इतिहासाचे प्रतीक असलेल्या गड-किल्ल्यांचे जतन करणे ही केवळ शासनाचीच नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी विधानसभेत ठामपणे नमूद केले.

### बीड शहर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

यांच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार सय्यद शहंशाह हे करत आहेत. दरम्यान शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मटका जुगार जोरात सुरू असून त्याकडे देखील पोलिसांनी लक्ष घालावे अशी मागणी या निमित्ताने नागरिकांमधून होताना दिसून आली.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी दोघांना १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

अशा आशयाच्या पिडीतेच्या वडीलांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे आरोपी विरूध्द कलम ३६३, ३६६(अ), ३७६(२) (जे) (एन) भादवी आणि कलम ४, १७ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालीन पोलीस उपनिरीक्षक एम.बी.तुपे यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय तथा विशेष न्यायालय, बीड येथे आरोपी विरूद्ध दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावनी व्ही.एच. पाटवदकर, अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश - १ तथा विशेष न्यायाधीश, बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ८ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणात पिडीता हिचा जबाब, वैद्यकिय पुरावा व कागदपत्रे यावरून व सहा. सरकारी वकिल अमित पी. हसेगांवकर यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा. व्ही.एच. पाटवदकर, अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश- १ तथा विशेष न्यायाधीश, बीड यांनी आरोपी नंबर १ यास कलम ३६३ अन्वये दोषी ठरवनु ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/- रूपये दंड आणि दंड न भरल्यास १ महिने साधा कारावास तसेच कलम ३६६ (अ) अन्वये दोषी ठरवनु पाच वर्ष सश्रम कारावास व २०००/- रूपये दंड आणि दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास व ३७६ (२) (जे) अन्वये दोषी ठरवुन १० वर्ष सश्रम कारावास व ३,०००/- रूपये दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच सहकलम ४ बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदयान्वये दोषी ठरवनु १० वर्ष सश्रम कारावास व ३,०००/- रूपये दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच आरोपी नंबर २ सारीका रामेश्वर भोसले हिस आरोपीस गुन्हयात सहकार्य केल्याबद्दल कलम १७ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अन्वये दोषी ठरवनु १० वर्ष सश्रम कारावास व ३,०००/- रूपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात सहा. सरकारी वकिल अमित पी. हसेगांवकर यांनी काम पाहिले व त्यांना कोर्ट पैरवी पी.एस. गव्हाणे सफौ/५५६, कोर्ट ड्युटी रंजना बरडे, शिवाजी नगर पोलीस स्टेशन यांनी सहकार्य केले.

### प्रत्येकाने जीवनात येऊन ईश्वराचे नामस्मरण करून जीवन सार्थक करावे

हरिनाम सप्ताहातून नामस्मरणाची गुढी उभारणे गरजेचे आहे. संकटे कितीही आली तर याला न घाबरता सतत आपले जीवन सार्थक करण्यासाठी नामस्मरण करावे, असे भागवताचार्य सुरेश महाराज लांडे यांनी शेवटी सांगितले.

### गायक राज रायते यांचा तेली समाज रत्न पुरस्काराने गौरव

गौरवण्यात आले आहे. संस्थापक: अध्यक्ष अजय चौधरी यांनी गायक राज रायते यांचा सन्मान सत्कार करून जामनेर जळगाव येथे गायनाचा कार्यक्रम ही मोठ्या प्रमाणात केला आहे. तेली समाजाचे समाजकार्य, संताजी जगनाडे महाराज यांची गीत गाऊन त्यांची अभंग गाथा सर्व जगासमोर आणणारे राज रायते यांना आत्तापर्यंत अनेक राज्यस्तरीय पुरस्कार, सन्मान, सत्कार , गायनाचे कार्यक्रम, गाव , शहरी झाले आहेत. तेली समाजाचा मानाचा पुरस्कार तेली समाज रत्न राज रायते यांना प्राप्त झाला आहे. या सर्व यशाचे श्रेय श्री संत संताजी जगनाडे महाराज व संपूर्ण तेली समाज बांधव तसेच माझे पंजोबा : संत. आसारामजी वैजनाथराव रायते , आजोबा: चंद्रकांत आसारामजी रायते आणि संताची जगनाडे महाराज यांचे गायनाचे लेखक स्वतः राज चे वडील: प्रल्हाद रायते आणि राज च्या मातोश्री: सोनाली रायते यांच्या सर्वांचा माझ्या पाठीशी आशीर्वाद आणि पुण्याई आहे. माझ्या आत्तापर्यंत सर्व गीताला समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात साथ दिली, या साथीमुळे माझे सर्व गीत आज प्रसिद्ध झाले आहेत. आणि यापुढेही संताजी जगनाडे महाराज यांचे गीत मी काढणार आहे, आपला असाच आशीर्वाद, प्रेम आणि साथ सदैव माझ्या पाठीशी राहो.

### गुरव समाजाचा मुंबईत १७ मार्चला मोर्चा

जाणार आहे. गुरु समाज अनेक प्रमुख प्रलंबित मागण्यासाठी आक्रमक झाला आहे यामध्ये देवस्थान इनाम वर्ग तीनच्या जमिनीचा प्रश्न मार्गी लावून त्यावरील वतन खालचा करणे जमिनीच्या फेरस सर्वे करून बेकायदेशीर हस्तांतरण रद्द करणे व मूळ सण ताबा मिळवून देणे यासारख्या मुद्द्याच्या समावेश आहे व सर्व मंदिर चेष्टामध्ये गुरव समाधान ५० टक्के विश्वास मिळवावेत उपोषणांचा परंपरागत पूजाच्या हक्क आबादीत राहावा आणि साठ वर्षावरील पुजाराला निवृत्ती वेतनाचा ५ हजार रुपये मासिक मानधन तातडीने लागू करावे व सन १९४९ च्या सार्वजनिक विश्वस्त कायद्यातील कलम ३६ मध्ये दुरुस्ती ओबीसी आरक्षण अंतर्गत लोकसंख्येनुसार निधीत वाढ व समाजात होणारे हल्ले रोखण्यासाठी मागणी प्रलंबित आहे आंदोलनाला राज्यस्तरी विविध संघटनेने पाठिंबा दिला अशी माहिती प्रसिद्ध आहे बीड जिल्हा संजय कल्याणकर गुरव यांनी दिले आहे.

### वकिलांच्या समस्येची आ.सुरेश धस यांच्याकडून थेट दखल

उपकोषागार कार्यालयाला अधिकृत पत्र देण्यात आले. पाटोद्यात तातडीने पाच व दहा रुपयांची न्यायालयीन स्टॅम्प तिकिटे उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश आमदार धस यांनी दिले. आमदारांच्या पत्रानंतर उपकोषागार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तातडीने बीडकडे रवाना झाले. उपकोषागाराचे प्रभारी अधिकारी बी. के. बिनवडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बीड येथून तातडीने काही तिकिटांचा साठा पाटोद्यात पाठविण्यात येत असून शुक्रवारी दुपारपर्यंत तिकिटे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यानंतर सोमवारपासून पाटोद्यातील अधिकृत विक्रेत्यांमार्फत तिकिटांचे प्रत्यक्ष वितरण सुरू केले जाईल. आमदार सुरेश धस यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे वकील बांधवांची दीर्घकाळापासूनची अडचण दूर होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. वकील संघाच्या वतीने अध्यक्ष ॲड.बी.आर.लवुळ, ॲड.सचिन जावळे व ॲड.सय्यद आशरफ यांनी आ.धस यांचे आभार मानले आहेत.

### श्रीमती पुष्पा जाधव यांना पीएच.डी.प्रदान

विभागाचे तत्कालीन प्रमुख डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . संतोष उंदरे, डॉ. मनोहर सिरसाट ( मराठी विभाग प्रमुख ), सर्व मराठी विभागातील सहकारी, डॉ. महारूद्र जगताप, व इतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### पिंपळनेर परिसरात लिंबूची मागणी वाढली

फळांचे रस यांना मागणी वाढली आहे. त्यात लिंबाच्या सरबताना मोठी मागणी आहे. शिवाय रोजच्या जेवणात हीअनेक लोक लिंबाचा वापर करत असल्याने सध्या बाजारात लिंबांना मागणी आहे. त्यामुळे मागणीत झालेली वाढ पाहता दर वाढल्याचे नाळवंडीचे व्यापारी राऊत डिगांबर यांनी सांगीतले आहे.

### कड्यात मोहटादेवी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह

सकाळी ८ वाजता कलश पूजन होऊन सप्ताहाचे मुख्य कार्यक्रम सुरू होतील. सप्ताहाच्या काळात दररोज सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ आणि ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. निळकंठ महाराज तावरे यांची सकल संत चरित्र कथा होणार आहे. त्यानंतर दररोज रात्री साडेआठ वाजता सामुदायिक आरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाच्या प्रत्येक दिवशी विविध देणगीदारांकडून भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. रविवार, २२ मार्च रोजी रात्री आराधी व गोंधळी यांचा गायनाचा कार्यक्रम होईल. सोमवार दिनांक २३ मार्च रोजी पहाटे ४ वाजता देवीला अभिषेक, होमहवन आणि देवीच्या पालखीची सवाद्य मिरवणूक काढली जाईल. सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. रघुनाथ महाराज धामणगावकर यांचे काल्याचे कीर्तन होईल आणि त्यानंतर महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होईल. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दिव्यांगांनी अनुदान सुरक्षिततेसाठी युडीआयडीला ई-आधार जोडावे - जे.डी.शाह

तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग पेन्शन योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी युडीआयडी ला ई-आधार कार्ड संलग्न अनिवार्यपणे आवश्यक असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शासनाच्या २७ जून २०२४ च्या निर्देशानुसार दिव्यांग लाभार्थ्यांची नोंदणी आणि पडताळणी करण्यासाठी युडीआयडी ला ई- आधार कार्ड संलग्न करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांनी अद्याप कार्ड काढलेले नाही किंवा ज्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र ऑनलाईन नोंदणीकृत नाही. त्यांनी तातडीने प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक केले आहे. जिल्ह्यातील तहसील कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यासह तालुक्यातील अनेक दिव्यांग लाभार्थ्यांनी अजूनही कार्ड काढलेले नाही. त्यामुळे अशा लाभार्थ्यांनी दिव्यांग प्रमाणपत्राला ई- आधार कार्ड संलग्न आणि आवश्यक कागदपत्रांसह संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्वरित कार्ड तयार करून घ्यावे, असे प्रशासनाने सांगितले आहे. तसेच सामाजिक कार्यकर्ते. लोकप्रतिनिधी आणि पक्ष प्रतिनिधींनी आपल्या परिसरातील दिव्यांग नागरिकांना याबाबत मार्गदर्शन करून शासनाच्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे असे पत्रात नमूद केले आहे. पत्रात शेवटी म्हटले आहे. की शासनाच्या सूचनांनुसार दिव्यांग लाभार्थ्यांची नोंदणी युआयडी कार्डाला ई- आधार ऑनलाईन प्रणालीमध्ये संलग्न अत्यावश्यक आहे. अन्यथा भविष्यात योजनांचा लाभघेण्यात अडचणी येऊ शकतात. त्यामुळे बीड जिल्ह्यातील तसेच तालुक्यातील सर्व दिव्यांग नागरिकांनी युडीआयडी कार्डमध्ये ई-आधार संलग्न करून घ्यावे पुर्वी केले असेल तर असेल तर पुन्हा एकदा आपल्या जवळच्या तहसील कार्यालयात संपर्क करून शासनाच्या योजनांचा लाभ सुरक्षित करावा व वाढीव अनुदान घ्यावे असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी केले आहे.

### छळाला कंटाळून विवाहितेने केली आत्महत्या

पती, सासू आणि सासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्या केलेल्या भक्तीला तीन मुली झाल्या होत्या, याच कारणावरून तिचा गेल्या अडीच वर्षांपासून शारीरिक व मानसिक छळ केला जात होता. नवऱ्याला दुसरे लग्न करण्यासाठी संमती द्यावी, यासाठी तिला वारंवार मारहाण करून एका बाँड पेपरवर लिहून देण्? सक्ती केली जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### जीवाचीवाडी येथील आरोग्य उपकेंद्र आठ दिवसापासुन बंद

सेवक होते ते बदली करून गेले, त्या जागी दुसरा कर्मचारी आलेच नाहीत. आरोग्य उप केंद्रात चार कर्मचारी आहेत. एमपीडब्लु व नियमित आलेले दिसत नाहीत. तिन महिला कर्मचारी आहेत त्यापैकी एकीची गेल्या तिन वर्षा पासुन दुसऱ्या गावात प्रतिनियुक्ती केली आहे. समुदाय आरोग्य अधिकारी, ए एन एम दोन्ही सहा दिवसा पासुन अनुपस्थित असल्याने तालुका वैद्यकीय अधिकारी यांची पाठराखण आहे काय ? त्यांना अभय कोणाचे आहे ? जीवाची वाडी आरोग्य उप केंद्र कायम बंद असल्याने वरीष्ठ काय कारवाई करनार याकडे ग्रामस्थ लक्ष वेधुन आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १३ मार्च २०२६ पान -३


## पुणे येथे रविवारी वंजारी वधु वर परिचय मेळावा

बीड दि १२ (प्रतिनिधी) - राष्ट्रसंत भगवान बाबा प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड शहर पुणे च्या वतीने १८ वा राज्यस्तरीय वंजारी वधु वर परिचय मेळावा दि. १५ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग. दि. माडगूळकर सभागृह, निगडी, पुणे येथे संयोजक समितीचे राहुल नागरगोजे,नारायण जायभाय,सुरेश घुगे व सुप्रिया ताई पांडे यांनी वंजारी वधू वर परिचय मेळाव्यास वंजारी समाजातील वधू-वर व पालक यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. तरी बीड जिल्ह्यातील इच्छुक वधू वर व पालकांनी जास्तीत जास्त संख्येने पुणे येथील वंजारी वधु वर परिचय मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन अ. भा. संत भगवान बाबा वधू वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु वर शाखा बीडचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

# केसोना गॅस एजन्सी मध्ये ग्राहकांनी केली एकच गर्दी तर नोंदणीसाठी गर्दी होताच एजन्सीने पुढे केले नियम





बीड दि १२(प्रतिनीधी)-आखाती देशांमधून इंधन आयात करणारा भारत हा देश आहे. असे असतानाच आखातामध्ये ईराण विरूद्ध इजराइल-अमेरिका असे युद्ध पेटले गेले. त्यामुळे भारतात गॅस डिझेल पेट्रोलची टंचाई निर्माण होणार असे चॅनल वाल्यांनी भाकीत करणे चालवले तसे केंद्र सरकारच्या वतीने याबद्दल नियोजन करण्यात आल्याचे नमूद केले. सुरुवातीला चार-पाच दिवस लोकांनी विश्वास देखील टाकला परंतु गॅसची टाकी ६५ रुपयाने महागली तसे भविष्याचा विचार सुरू झाला आणि गॅस ग्राहकांनी गॅस नोंदणीसाठी एकच गर्दी करायला सुरुवात केली. तसे अचानक जागे झालेल्या गॅस कंपन्यांच्या सूचनावरून गॅस एजन्सी नियमाचा बडगा लावण्यात चालवले असल्याचे चित्र येथील केसोना गॅस एजन्सी मध्ये पाहायला मिळाले. आतापर्यंत कसलेही नियम न लावताना घरपोच गॅस पुरवठा केला जात होता, मग अशा परिस्थितीमध्ये नियम कसे काय पुढे आले? असा सवाल गॅस ग्राहक करताना केसोना गॅस मधील कर्मचारी आणि गॅस ग्राहक यांच्यात तोंडा-तोंडी होत असल्याने गॅस ग्राहकांच्या प्रश्नांच्या भडीमारापुढे गॅस एजन्सी मधील कर्मचारी देखील हतबल होत असतानाचे चित्र पाहायला मिळाले.

आखातामध्ये युद्ध पेटून बारा-तेरा दिवस उलटले आहेत. युद्ध पेटल्यानंतर भारतामध्ये कसल्याही प्रकारची गॅस, डिझेल, पेट्रोल याची टंचाई भासणार नाही. आपल्याकडे भरपूर साठा असल्याचे केंद्राच्या वतीने सांगण्यात आले होते. सुरुवातीचे चार-पाच दिवस गॅस ग्राहक असो की वाहनधारक असोत यांनी यावर विश्वास ठेवला. परंतु चॅनल वाल्यांनी गॅस मिळेना म्हणून अमुक शहरात खानावळी व हॉटेल वाल्यानी चुली पेटवल्या अशा बातम्याला सुरुवात केली. दिवसभर कोणत्या ना कोणत्या गावातले वार्तांकन दिले जाई. यामुळे गॅस ग्राहक व वाहन धारकांनी एजन्सी व पेट्रोल पंपावर गर्दी करायला सुरुवात केली. महत्त्वाची बाब म्हणजे मागील पाच-सात दिवसाखाली गॅस एजन्सीच्या गाड्या गोल्लो गल्ली फिरताना दिसत होत्या, परंतु त्या देखील बंद झाल्या. नोंदणी न करता प्रत्येक ग्राहकाला गॅस मिळत जायचा तो बंद झाला. ऑनलाईन नोंदणी देखील बंद झाली असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आले. सरकार कितीही टंचाई होणार नाही असे सांगत असले तरी गॅस ग्राहकांचा विश्वास बसेनासे झाला आणि त्यांनी गॅस एजन्सीच्या दुकानावर एकच गर्दी करायला सुरुवात केली. ही गर्दी नोंदणीसाठी होत असतानाच येथील केसोना एजन्सी मध्ये वेगळे चित्र गॅसधारकांना दिसून आले. दिवसभर रांगेत उभे राहिल्यानंतर तेथील कर्मचारी प्रत्येक ग्राहकाला तुमचा पत्ता कुठला? मोबाईल नंबर कोणता? केवायसी करा. असे सुचवु लागल्याने गॅस ग्राहक देखील तावातावाने प्रश्नाचा भडीमार करू लागले. आज एवढे नियम सांगता पण त्या अगोदर दारावून जात असलेला गॅस वितरक मागेल त्याला गॅस देत होता त्यावेळी कोठे गेले नियम? पूर्वी आम्ही केवायसी केली असताना आज पुन्हा कशासाठी केवायसी? असे एक ना एक प्रश्न करू लागले त्यामुळे गॅस एजन्सीचे कर्मचारी आणि गॅस ग्राहक यांच्या शाब्दिक चकमकी होऊ लागल्या आहेत.

### घरात भरपूर गॅस तरीही गर्दी

**मिळालेल्या माहितीप्रमाणे व कर्मचाऱ्यांनी सांगितल्यानुसार कित्येक गॅस ग्राहकांनी मागील आठ दिवसात सिलेंडर घेतलेले आहे. परंतु ते पुन्हा गॅस नोंदणी करून खरेदीसाठी गर्दी करीत आहेत.तर एकेका घरात दोन ते तीन गॅसचे सिलेंडर आहेत. वेळप्रसंगी टंचाई झाल्यास उपाय म्हणून गॅसची साठेबाजी करण्याचा प्रकार गॅस धारकांमधूनच होत असल्याचे स्पष्ट मत खुद एका ग्राहकाने या संदर्भात बोलताना व्यक्त केले गेले.**

### नियम व अटीच्या नावाखाली आम्हाला रांगेत उभे केले

ज्याप्रमाणे शेतकऱ्यांना कर्ज प्रकरणात किंवा पीक नुकसान संदर्भात केवायसी करा, फोटो टाका अशा प्रकारचे आवाहन करून योजना लांबविण्याचे काम सरकार करीत राहिले आहे. तसे आता एकीकडे गॅसची कसलीही टंचाई होणार नाही. याची खात्री देत गॅस ग्राहकांना दुसरीकडे नियम आणि अटीची पूर्तता करण्याचा घाट घालून नोटाबंदीप्रमाणे रांगेत उभे करायला भाग पाडत आहे. आज जे नियम आणि अटी सांगितल्या जातात त्या आखाती युद्धाच्या अगोदर का नव्हत्या? असा सवाल करत अगोदर तर एका गॅस ग्राहकाची नोंदणी करायला पाच ते सात मिनिट लागतात. त्यामुळे एजन्सी मध्ये दोन-तीन तास गर्दीत उभे राहण्याची वेळ गॅस ग्राहकावर आली असल्याचे एका ग्राहकाने सांगितले.

## आवसगाव येथे महिलांच्या उखाणे स्पर्धा घेऊन साजरा केला जागतिक महिला दिन



केज दि १२ (प्रतिनिधी)- तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आवसगाव यांच्या वतीने महिलांसाठी उखाणे स्पर्धा तसेच शालेय विद्यार्थिनींच्या विविध कलागुणांच्या सादरी करणाचा कार्यक्रम घेऊन जागतिक महिला दिन साजरा केला गेला.

या उपक्रमात गावातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित जिल्हा परिषद शाळेतील आदर्श शिक्षिका तसेच पालक प्रतिनिधी यांच्या शुभ हस्ते स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी काही महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. शालेय विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. तसेच विद्यार्थिनींनी ''जन्म बाईचा'' आणि ''बाईपण भारी देवा'' या गीतांवर आकर्षक सादरी करण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तर यावेळी घेतलेल्या उखाणे स्पर्धेमध्ये ४० महिलांनी सहभाग नोंदवला . यात प्रथम क्रमांक श्रीमती गंगासागर श्रीकृष्ण शिनगारे यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक श्रीमती छाया सोमनाथ पोतदार यांनी यांनी पटकावला. तर जास्त शब्दांचा मोठा उखाणा सादर केल्याबद्दल उत्तेजनार्थ पारितोषिक श्रीमती मोहरबाई जीवन शिनगारे व श्रीमती उषाबाई भरत साखरे यांना देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी प्रिय शिक्षिका श्रीमती साठे मॅडम, श्रीमती कुलकर्णी मॅडम व श्रीमती जाधव मॅडम यांच्या पुढाकारातून करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित महिलांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती साठे मॅडम यांनी केले. महिलांना विशेष मार्गदर्शन श्रीमती जाधव मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जाधव मॅडम यांनी केले. जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका श्रीमती कुलकर्णी मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले व सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## कालिकादेवी मुर्ती प्राणप्रतिष्ठा दिन साजरा



बीड दि १२ (प्रतिनिधी) - शहरातील बलभीम चौकातील मंदिर येथे कालिकादेवी मुर्ति पुनप्राणप्रतिष्ठापनेचा तृतीय वर्धापन दिन सोहळा सोमवारी - मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाप्रसाद अन्नदानाचे यजमानपद मुळ शिरूर रहिवासी तथा पुणेकर रमाकांत कानडे यांनी स्विकारले होते. कालिकादेवी मुर्ती नव्याने स्थापित न केली तेव्हापासुन त्याच तिथीला वर्धापन दिन साजरा करण्याची प्रथा बीड येथील कासार समाज बांधवानी सुरू केली. या वर्षी तृतिय वर्धापन दिन उत्साहात साजरा केला गेला. सकाळी देवीच्या मुर्तीला अभिषेक, महावस्त्र परिधान करून सामुहिक आरतीचा कार्यक्रम झाल्यानंतर सर्व समाजबांधवांना सुरूची भोजन अर्थात महाप्रसाद दिला गेला. या वेळी अध्यक्षस्थानी जेष्ट मार्गदर्शक महादेव हुलजुते अभियंता, कासार समाज अध्यक्ष शरद भांडेकर, शिरूर कालिका देवी संस्थानचे अध्यक्ष रोहीदास पाटील, सचिव बापुराव गाडेकर, ज्ञानेश्वरी पारायण फंडाचे अध्यक्ष अरूणजी वेळापुरे, कालिकादेवी संस्थानचे अध्यक्ष अनिल भांडेकर व सपत्निक रमाकांत कानडे, प्रभाकर कानडे, पुणे जिल्हा विकास समितीचे अध्यक्ष रोहन उंडे, भास्कर अंदूरे, शिवाजी काटकर बीड संस्थानचे कार्याध्यक्ष नागेश शृंगारे, उपाध्यक्ष प्रविण कोळपकर, सचिव किरण जवकर, कोषाध्यक्ष राहुल शेटे आदिसह प्रा. भालचंद्र भांडेकर, कमलाकर भांडेकर, विजय गाडेकर, उमेश हुलजुते, अनिल शेटे, बाळू रासने, शेखर जवकर रामेश्वर हुलजुते, प्रशांत धुमाळ, अमित सासवडे, गणेश वनगुजरे, सुनिल पाथरकर, महारूद्र विर, श्रीरंग लातुरकर, अमोल जवकर दिपक दगडे, सचिन जवकर, राजेंद्र जवकर सह समाजबांधव व महिला भगिनी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर जयंती अध्यक्षपदी अजय सुरवसे यांची निवड



बीड दि १२ (प्रतिनिधी)- शहरातील त्रिरत्न बौद्ध विहार पंचशील नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या निमित्ताने माजी पंचायत समिती सदस्या मीना (ताई) मस्के यांच्या अध्यक्षतेखाली तसेच नगरसेवक प्रमोद (आण्णा) शिंदे, संजय मिसाळ, महेंद्र वडमारे, संतोष जोगदंड, के. के. वडमारे,, अलका (ताई) डोंगरे, वंदना (ताई) पंडित यांच्या प्रमुख मार्गदर्शन व उपस्थितीत बैठक होऊन जयंती उत्सव कार्यकारिणीची निवड करण्यात आली ती पुढील प्रमाणेयावेळी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अजय सुरवसे, सचिव- अक्षय तरकसे, उपाध्यक्ष- तेजस खरात, सहसचिव- मयंक जाधव, कोशाध्यक्ष- शुभम सोनवणे कार्याध्यक्ष- आनंद खेमाडे, व सदस्य म्हणून ओंकार सोनवणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर यंदाची जयंती भव्य, दिव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्याचा सामूहिक निर्धार करण्यात आला.यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव उपस्थित होते.

## रमजान महिन्यात शहरात भेसळयुक्त दूध ;अन्न व औषध प्रशासन झोपलेय काय ?- शेख युनूस

बीड दि १२ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यातच नव्हे, तर पूर्ण शहरात काही ठिकाणी भेसळयुक्त दूध येत आहे, ज्यांच्याकडे एक दोन म्हशी आहे ते पण १५० ते २०० लिटर दूध विक्रीला आणत आहे. शहरात बऱ्याच ठिकाणी पुड्या मार्फत दूध विकले जात आहे. पण हे दूध म्हशी,गाय, शेळीचे नसून पावडरयुक्त दूध विकले जात असताना अन्न आणि औषध प्रशासनाचे अधिकारी झोपले आहेत काय असा खडासावा शेक युनूस यांनी प्रसिद्धी पत्रकातून केला.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की सध्या पवित्र रमजान महिन्याचा उपवास चालू असून मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात दुधाची खरेदी करतात. घरी येऊन दूध पुरवठा करणाऱ्या कडे मागणीनुसार दूध उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना त्या व्यक्तीकडून किंवा दुसरीकडून दूध विकत आणावे लागते परंतु सदर दूध भेसळयुक्त असल्याचे प्रत्येक ग्राहकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. नव्हे तर अशा भेसळयुक्त दुधामुळे अशा दुधाचा चहा प्राशन करणाऱ्या किंवा सेवन करणाऱ्या लोकांना पोटाचा आजार जाणवत असल्याचे देखील सांगितले जाते आहेत. एवढेच नाही तर या दुधामुळे एलर्जी, किडनी समस्या, प्रोटीन कमी होणे, कॅल्शियम कमी होणे, विटामिन कमी होणे, बाळाच्या हाडाची समस्या, बाळाच्या दाताची समस्या, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कॅन्सर, हृदय समस्या, किडनी फेल अशा बरेच रोगाला कारणीभूत हे भेसळयुक्त दूध ठरण्याची शक्यता आहे. बीड शहरामध्ये सर्वत्र भेसळयुक्त दुधाची विक्री होत असताना सदर विक्री होणारे दूध खाण्यासाठी किंवा चहासाठी योग्य आहे काय हे पाहण्याची जबाबदारी अन्न आणि औषध प्रशासनाचे असताना हे प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी मात्र झोपेत असल्यासारखे दिसत आहेत तरी रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर या खात्याच्या अधिकाऱ्यांनी झोपेतून उठून दहा पाच ठिकाणी दुधाच्या चाचण्या तरी घ्याव्यात व भेसळयुक्त दूध विकणाऱ्या वर कारवाया कराव्यात अशी मागणी जनतेमधून होऊ लागली असून अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी याची योग्य दखल घ्यावी अशी मागणी देखील शेख युनूस यांनी केली.

## माजलगाव मध्ये गुंतागुंतीची ब्रेस्ट कॅन्सरची यशस्वी शस्त्रक्रिया



माजलगाव दि.१२( प्रतिनिधी) शहरातील बाबरे हॉस्पिटलचे शल्यचिकित्सक व मूत्रपिंड तज्ञ डॉ .गणेश रामप्रसाद बाबरे यांनी भूलतज्ञ डॉ. गोपाळ शिंदे यांच्या मदतीने गुंतागुंतीची स्तन कर्करोगाची गाठ शस्त्रक्रियेद्वारे काढून महिलेला रोगमुक्त केले आहे.

शहरातील आबूज कॉम्प्लेक्स गेवराई रोड येथे डॉक्टर गणेश बाबरे यांचे बाबरे हॉस्पिटल असून या रुग्णालयात पाथरी तालुक्यातील मरडसगाव येथील वयोवृद्ध महिला रुग्ण डाव्या स्तनातील गाठीच्या त्रासामुळे रुग्णालयात दाखल झाली होती. ऋछअउ तपासणीनंतर त्यांना कर्करोग असल्याचे निदान झाले. रुग्णाची परिस्थिती जेमतेम असल्यामुळे त्यांची शस्त्रक्रिया( चठच) चगझअगअध सुविधांमध्ये डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले यांच्या संजीवनी हॉस्पिटलमध्ये करण्यात आली शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची स्थिती स्थिर असून उपचार चालू आहेत.तर योग्य डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास उपचार शक्य असल्याचे डॉ.गणेश बाबरे यांनी यावेळी सांगतांना स्तना चा कर्करोग योग्य वेळी निदान निदान झाल्यास पूर्णपणे बरा होऊ शकतो रुग्णाचा सकारात्मक प्रतिसाद व आमच्या टीमच्या कौशल्यामुळे ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली असे सांगितले . एम जे पी जे ए वाय योजनेअंतर्गत गोरगरीब जनतेची सेवा होत आहे :डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले. संजीवनी हॉस्पिटल मध्ये सर्व हाडाच्या ,मुतखडा व कॅन्सरच्या शस्त्रक्रिया योजनेमध्ये मोफत होत आहे याचा गोरगरीब रुग्ण लाभ घेत आहे.खालील शस्त्रक्रिया( एम जे पी जे ए वाय) अंतर्गत फ्री करत आहेत .१)मुतखड्यावरील सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया २)प्रोस्टेट ग्रंथीची शस्त्रक्रिया दुर्बिणीतून ३)लघवीच्या सर्व आजारावरील शस्त्रक्रिया.

## देशात महिला सक्षमीकरणाचा प्रारंभ सावित्रीबाईनी केला-प्रा.लक्ष्मण गुंजाळ

बीड दि १२( प्रतिनिधी) - १९ व्या शतकात महिला सक्षमीकरणासाठीच्या उपाययोजना आणि कार्यक्रम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजाला दिले.शिक्षण हा स्त्री अधिकाराचाच भाग आहे असे निक्षुण सांगून स्त्री शिक्षणाच्या प्रक्रियेला गती दिली, असे गौरवोद्गार ओबीसीचे जेष्ठ नेते प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी काढले.

येथील श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्ट द्वारा आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या पुण्यतिथी निमित्त प्रमुख वक्ते म्हणून गुंजाळ बोलत होते.ते पुढे बोलताना ते म्हणाले की शिक्षणाबरोबरच त्यांनी परंपरेने चालत आलेल्या बालिकाहत्या, केशवपन, हुंडा पद्धती, सती प्रथा इत्यादींचे खंडन करून विधवा पुनर्विवाहला गती दिली. समाजातील जातिवाद संपवण्यासाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले. अशाप्रकारे क्रांतिकारी कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले.तेच दिशादर्शक कार्य करण्याची आज गरज आहे. असेही ते म्हणाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे पत्रकार नारायण नागरे यांचेही यावेळी समायोचित भाषण झाले. शहरात श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टने अल्पावधीत मोठे काम उभा केले आहे. त्यात सातत्या राहावी. महापुरुषांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी केल्यामुळे समाजात सुसंवाद वाढतो असेही ते म्हणाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक ट्रस्टचे सचिव शामसुंदर घाडगे यांनी केले. प्रस्ताविका त्यांनी भ्रष्टाचे ध्येय धोरण स्पष्ट केले.याप्रसंगी सर्वश्री ट्रस्टचे अध्यक्ष गोरख यादव, सहसचिव नितीन साखरे, कोषाध्यक्ष मोहनराव गोरे, कार्याध्यक्ष भागवत शिंदे,सदस्य नामदेव दुधाळ, किशोर जवंजाळ, पाननखडे इत्यादींची उपस्थिती होती.

## केज येथे भगवान श्रीकृष्ण आश्रमात १०८ कुंडी महाविष्णू यागाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ



चिंचोली माळी (प्रतिनिधी)- केज शहरापासून जवळ असलेल्या व मजरसुंबा राष्ट्रीय महामार्गा लगत असलेल्या भगवान श्रीकृष्ण आश्रम परिसर येथे बुधवार, दि.११ मार्च रोजी १०८ कुंडी महाविष्णू यागारा मोठ्या भक्तीमुळे वातावरणात सुरुवात झाली. श्रीकृष्ण मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्याचे औचित्य साधून १०८ कुंडी महाविष्णू यज्ञ, श्रीराम कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे जय्यत आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण आणि उपस्थितीमध्ये या सोहळ्यासाठी हिमाचल प्रदेश येथील महंत तपस्वी परमहंस श्री १००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली आहे. तसेच, रामायणाचार्य ह.भ.प. रामराव ढोक महाराज (नागपूर) यांच्या रसाळ वाणीतून संगीत श्रीराम कथा सादर केली जाणार आहे. दि.११ मार्च पासून सुरू झालेला हा सोहळा १९ मार्च पर्यंत चालणार असून दररोज सकाळी ८ ते ११ महाविष्णू १०८ कुंडी यज्ञ, दुपारी २ ते ५ संगीतमय तुलसी रामायण कथा, सायंकाळी विविध धार्मिक कार्यक्रम तसेच रात्री ८ ते १० हरि कीर्तन व हरिजागर असे कार्यक्रम संपन्न होणार आहेत. श्रीराम कथेसाठी ५ हजार भाविक बसू शकतील असा वॉटरप्रूफ मंडप तयार करण्यात आला आहे. भाविकांसाठी दररोज महाप्रसाद व अन्नदानाची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. तरी परिसरा तील सर्व भाविकांनी आणि धर्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अमृततुल्य यज्ञ सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आश्रमाचे संस्थापक भागवत भूषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री व भगवान श्रीकृष्ण आश्रम परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर ;तीन हॉटेलवर छापा

## बड्या हॉटेलवाल्यांना पुरवठा विभागाने सूट दिली आहे काय ; नागरिकांचा सवाल

बीड दि १२ ( प्रतिनिधी)- इराण-इजराइल-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्वयंपाकाच्या गॅसची संभाव्य टंचाई लक्षात घेता घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर करणाऱ्यांवर पुरवठा विभागाने कारवाई सुरू केली आहे. बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील तीन हॉटेलवर छापा टाकून घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे हॉटेल व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. फक्त नगर रोडवरील हॉटेल कारवाई करण्यात आल्याने पुरवठा विभागाच्या कारवाईवर संशय व्यक्त केला जात आहे.

घरगुती गॅस सर्वसामान्य ग्राहकांना उपलब्ध व्हावा यासाठी केंद्र सरकारने कठोर पावले उचलत व्यावसायिक वापरावर निर्बंध आणले आहेत. मात्र बीडमध्ये अनेक हॉटेल, खानावळ व धाब्यांमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा सर्रास वापर होत असल्याचे चित्र आहे.याच पार्श्वभूमीवर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील ''श्री हॉटेल'', ''समाधान हॉटेल'' आणि ''रायगड हॉटेल'' येथे छापा टाकला. तपासणी दरम्यान या हॉटेलमध्ये नफेखोरीसाठी घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे आढळून आले. त्यामुळे तिन्ही ठिकाणांहून सिलेंडर जप्त करण्यात आले.या कारवाईत नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, मंडळ अधिकारी अनिल तांदळे, तलाठी शब्बीर पठाण, तालुका पुरवठा विभागातील अव्वल कारकून श्रीराम वैभव व संतोष मुळीक यांनी सहभाग घेतला.



पुरवठा विभागाने स्पष्ट केले की गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर अशा कारवाया पुढेही सुरू राहणार आहेत.दरम्यान, बीड शहरातील काही मोठ्या हॉटेलमध्येही घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे दिसून येत असून बड्या हॉटेल्सवर कारवाई होत नसल्याबद्दल नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. ''मोठ्या हॉटेलना सूट आणि छोट्या व्यवसायिकांवरच कारवाई'' अशी प्रतिक्रिया शहरात उमटत असून मोठ्या हॉटेलवरही समान कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.बीड शहरातील बार्शी रोड जालना रोड तसेच सर्व धावे हॉटेलवर घरगुती गॅस सिलिंडरचा सर्रास वापर होत असून घरगुती सिलेंडर वापरणाऱ्या फक्त हॉटेलवर कारवाई न करता संबंधित गॅस एजन्सीवर देखील कारवाई करण्यात यावी अशी देखील मागणी नागरिकात होत आहे. यासंदर्भात लोकांमधून ऐकण्यात आलेली चर्चा अशी की ज्या हॉटेलवर कारवाई केली ते हॉटेल चालक आणि महसूल चे कर्मचारी हे एकमेकांना ओळखीचा परंतु काही वेळा हॉटेलवाल्याकडून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात येत नसल्याने आलेल्या संधीचा फायदा घेतला असल्याची चर्चा होऊ लागली आहे. जर कारवायाच करायचे असतील तर पथकाने इतर बड्या हॉटेलकडे का दुर्लक्ष केले? असा सवाल देखील केला जाऊ लागला आहे.



मादळमोही - गेवराई तालुक्यातील मादळमोही ग्रामपंचायत कार्यालयात जल सुरक्षा दिनानिमित्त गावाला सुरक्षित पाणीपुरवठा करणारे कर्मचारी प्रल्हाद नागरगोजे, दिगंबर चौधरी, काळुबाई पठाण, महादेव धुरंदरे, कृष्णा पुरी यांचा सत्कार करते वेळी सरपंच राजेंद्र वारंगे, माजी सरपंच अरुण जिजा वाघमारे, ग्रामपंचायत अधिकारी चोपडे, ग्रा.पं. सदस्य हरिभाऊ भोपळे, आबासाहेब धुरंधरे आदी

# संपादकीय

## विधिमंडळ विरुद्ध प्रशासन संघर्ष का पेटलाय ?

विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाला संलग्न गॅलऱ्यांमध्ये प्रेक्षक गॅलरी, अध्यक्ष गॅलरी, वार्ताहर गॅलरी, विदेशातील शिष्टमंडळे व राजदूत आणि संसद सदस्यांसाठी गॅलरी आहेत. केवळ इतर देशातील पाहुणे गॅलरीत उपस्थित असल्यास त्यांची दखल घेतली जाते व स्वागत केले जाते. अधिकारी गॅलरी महत्त्वाची असली तरी त्याची कामकाजात अधिकृत दखल कधीच घेतली जात नसते. पण गेल्या काही वर्षांत या गॅलरीचा उल्लेख सदनात वारंवार होऊ लागला आहे. याची कारणे अनेक आहेत. मंगळवारी अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरूवात होत असताना सभागृहात चार मंत्री हजर होते. तर अधिकारी गॅलरीत काही मोजके चेहरे दिसत होते. विरोधी बाकांवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील बोलायला उभे राहत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप वळसे पाटील यांनी सभागृहातील मंत्र्यांची उपस्थिती व अधिकाऱ्यांची रिकामी दिसणारी गॅलरी यावर भाष्य केले. त्यावरून मोठा गहजब झाला. वळसे पाटील व जयंत पाटील या दोघांची विधानसभेतील ही सलग आठवी टर्म आहे. दोघेही शरद पवारांचे शिष्य आहेत. राजकारणी म्हणून पवारांविषयी अनेक मत-मतांतरे असली तरी त्यांनी संसदीय प्रथा-परंपरांचे उल्लंघन केल्याचे फारसे दाखले नाहीत. पण त्यांच्या तालमीत तयार झालेल्यांना यावर भाष्य करावे लागते, हे विशेष. शिवाय त्यावर अध्यक्ष राहुल नार्वेकर बोलते झाले. ही शेवटची संधी आहे असे त्यांनी प्रशासनाला बजावताच राज्याच्या उच्चस्तरीय अधिकारीवर्गात नक्कीच चर्चा झाली असणार. अर्थसंकल्पावरील चर्चा हा संसदीय लोकशाहीतला फार महत्त्वाचा भाग आहे. याचे कारण सरकार विधिमंडळाच्या अनुमतीशिवाय सरकारी तिजोरीतला एक रुपयाही खर्च करू शकत नाही. त्यासाठी दरवर्षी राज्याचा आर्थिक ताळेबंद सरकारकडून मांडला जातो व त्याला सभागृहाची अनुमती घेतली जाते. त्याआधी अर्थसंकल्पावर विस्तृत चर्चा आणि विरोधकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना सरकारकडून समाधानकारक उत्तर मिळणे हा राज्यातल्या जनतेचा अधिकार आहे. कारण ते त्यांच्या कष्टाच्या कमाईतला हिस्सा कररूपाने सरकारी तिजोरीत जमा करत असतात. पण अलीकडच्या काही वर्षात हा केवळ सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातला सामना बनत असल्याचे चित्र निर्माण होत आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेला सरकारमधील सर्व वरिष्ठ मंडळी उपस्थित असणे हा संकेत आणि परंपरा आहे. पण आता सभागृहात अर्थमंत्री तर सोडाच पण राज्यमंत्रीही उपस्थित नाहीत, असे वळसे-पाटील म्हणाले. स्वतः अर्थमंत्रीपद भुषविलेल्या वळसे-पाटील यांच्यावर हे बोलण्याची वेळ आली. अध्यक्षांना त्यावर कडक भूमिका घ्यावी लागली. हा विषय केवळ सरकार आणि विरोधक यांच्यापुरता मर्यादित राहत नाही. विधिमंडळाचे प्रत्येक अधिवेशन सुरू होण्यापूर्वी गेल्या काही वर्षांपासून एक शासन आदेश जारी केला जातो. त्यात शासनाकडून विधिमंडळ कामकाजाबाबत काय खबरदारी घ्यायला हवी याच्या मुद्देनिहाय सूचना असतात. अधिकाऱ्यांनी गॅलरीत उपस्थित राहण्यापासून ते मंत्र्यांना प्रत्येक विषयावर टिपण तयार करून देण्यापर्यंत सविस्तर सूचना असतात. १५-२० मुद्द्यांची हे आदेश जारी करूनही अशी वेळ का येते ? बरे हे आदेश संसदीय कामकाज विभागाच्या सचिवांच्या सहीने जारी होतात, हे विशेष! एकूणच विधिमंडळ कामकाजाविषयी कोणाला किती गांभीर्य आहे हा खरा मुद्दा आहे. सरकार विरोधकांना गांभीर्याने घेते का, त्यानंतर विरोधक विधिमंडळाचे कामकाज गांभीर्याने घेतात का यावर प्रशासनाचे गांभीर्य ठरू लागले आहे. पूर्वी अधिकारी गॅलरीत राज्याचे सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहत. विरोधी बाकांवरून उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर मुख्यमंत्री, संबंधित मंत्री यांना सभागृहातील शिपायांमार्फत चिठ्ठ्या पाठवून ते विभागाची भूमिका कळवत. पण अलीकडे गॅलरीतील उपस्थिती रोडावली आहे. मंगळवारी अध्यक्षांनी तंबी देताच काही वेळात वित्त विभागाचे ज्येष्ठ अधिकारी गॅलरीत दिसून आले. संसदीय लोकशाहीचे गांभीर्य जितके जपले जाईल तितके प्रशासन शिस्तीत राहील. कामकाजात जेवढी तडफ दिसेल तेवढे अधिकारी चौकस राहतील. सरकार विरोधकांची पर्वा करत नाही, असे दिसल्यानंतर अधिकारी तरी कशाला पर्वा करतील. सरकारमध्येही काही बेबनाव असेल तर अधिकारीही तसेच वागतील. हे असेच चालू द्यायचे असेल तर प्रश्नच मिटला. मागच्या आठवड्यात राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे भारतीय प्रशासन सेवेतील सदस्य सचिव देवेंद्रसिंग व सहसंचालक सतिश पडवळ यांना निलंबित करण्याचे आदेश अध्यक्षस्थानावरून देण्यात आले. सभागृहात चर्चा होत असलेल्या विषयावर ते आपल्याला माहिती देण्यासाठी उपस्थित राहिले नाहीत, असे मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या. त्यावर सरकार म्हणून सभागृहात भूमिका मांडली जाणे अपेक्षित होते. लोकनियुक्त सरकारचा प्रशासनावर वचक नाही किंवा वरिष्ठ अधिकारी मंत्र्यांना जुमानत नाहीत हे दृष्य सभागृहात दिसायला नको होते. विरोधकांकडून याचा अचूक फायदा घेतला जाणे अपेक्षित होते. पण चर्चा भलतीकडे गेली. एक आयएएस अधिकारी सभागृहात निलंबित होतो याची वरिष्ठ अधिकाऱ्यांत चर्चा नक्कीच झाली असणार. तरीही अधिकारी गॅलरीत फारशी उपस्थिती नसणे हे अचंबित करणारे आहेच. शिवाय आपली दिशाच कुठेतरी चुकतेय असे दाखवते. प्रशासन म्हणजेच 'कार्यपालिका' हा राज्यघटनेने स्वतंत्र स्थान बहाल केलेला स्तंभ आहे. राज्यघटना आणि लोकहित याच्याशी बांधिलकी दाखवत प्रशासनाने काम करणे अपेक्षित आहे. चूक ते चूकच आणि बरोबर ते बरोबरच असे म्हणणे अपेक्षित आहे. शिवाय संसद व न्यायपालिका या दुसऱ्या दोन स्तंभाविषयी तितकेच गांभीर्य दाखविणे अभिप्रेत आहे. या समतोल ढळला तर फारच पंचाईत होईल. अलीकडे कार्यपालिका सत्ताभिमुख झाली आहे. जे सत्तेवर आहेत किंवा सत्तेवर वर्चस्व गाजवून आहेत त्यांच्याप्रती बांधिलकी दाखवा व इतरांना फारसे गांभीर्याने घेण्याची गरज नाही, अशी भूमिका घेतली जात आहे. काळ बदलतो, भूमिका बदलतात. तसेच हा देश, राज्य कोणा विशिष्ट व्यक्तिसमुहाची जहागीर नाही, लोक ठरवतील तसे चित्र बदलेल हे लक्षात घेतले जात नाही. राजकारणावर ज्यांचे वर्चस्व आहे त्यांच्याप्रती संवेदनशील रहा. कधी अडचणी आल्या तर तेच आपल्याला सहीसलामत बाहेर काढतील अशी भावना बळावत चालली आहे. आपल्याला मिळत असलेले पारिश्रामिक, सोयी-सुविधा, मान-मरताब हे सर्वसामान्य जनतेच्या कष्टातून उपलब्ध झालेले आहे. ते कष्ट मुंबईसारख्या महानगरातला सामान्य नोकरदार करतो, तसाच राज्याच्या दुसऱ्या टोकाला राहणारा, जगण्यासाठी धडपड करत मिळालेल्या चार पैशातून सरकारचे कर प्रामाणिकपणे भरणारा एखादा फाटका माणूसही करतो. त्यांचा लोकशाही मुल्यांवर विश्वास असेतोवर ते निर्वैधपणे सुरू राहणार आहे. तसेच आपल्याला मिळालेले अधिकार हे अनेकांच्या बलिदानातून, त्यागातून तयार झालेल्या एका सार्वभौम प्रजासत्ताकाचे अधिकार आहेत. तेव्हा आपली बांधिलकी, संवेदना व्यापक लोकहिताची असायला हवी, याचे भान सर्वांनी बाळगणे अपेक्षित आहे. त्या व्यापक लोकसंवेदनांचे प्रतिबिंब जोवर सभागृहात उमटत राहील तोवर आपली व्यवस्था उत्तम चालेल, हे ध्यानात राहिलेले बरे!

### आहार व तणाव रहित जीवन यावरच मानवी आरोग्य अवलंबून आहे - युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे

# परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे अभिष्टचिंतन निमित्त महाआरोग्य तसेच रक्तदान शिबीर संपन्न

माजलगाव दि १२ (प्रतिनिधी) -गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स माजलगाव च्या तर्फे आयोजित परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे बोलतांना आपले आरोग्य आपल्या आहारावर अवलंबून आहे, मानवी आरोग्यासाठी षड्रस आवश्यक असते. सकस, सेंद्रिय अन्न यामुळे आरोग्य सुदृढ राहते. याबरोबरच आयुर्वेद, आजीबाईचा बटवा, घरगुती दैनंदिन वापरातील औषधी वस्तू याविषयी अनमोल माहिती दिली. या शिबीराची सुरुवात दीपप्रज्वलन, श्री स्वामी समर्थ महाराज, धन्वंतरी, छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पूजन करून झाले.यावेळी भव्य रक्तदान शिबीरही घेण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये २१३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या महा आरोग्य शिबीरात सर्व रोगांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले.या शिबीराचे प्रास्ताविक करताना डॉ यशवंत राजेभोसले यांनी या महा आरोग्य शिबीराचे वैशिष्ट्य व पार्श्वभूमी मांडली. यानंतर कॅन्सर तज्ञ डॉ. नंदकुमार पाणसे यांनी आपल्या मनोगतातून सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर चे सामाजिक उपक्रम व गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट ने आयोजित केलेले महा आरोग्य शिबीर हा स्तुत्य उपक्रम आहे व या शिबीरास शुभेच्छा दिल्या. श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे मराठवाडा विभाग प्रतिनिधी संदीपभाऊ देशमुख, बीड जिल्हा प्रतिनिधी प्रा डॉ गोविंद साळुंके, अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी विजयराव कडु पाटील, युवा नेते रोहितभैय्या पंडित, बीड, परळी वै , अंबाजोगाई, धारुर, वडवणी, गेवराई, माजलगाव तालुक्यातील तसेच परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व साप्ताहिक, दैनिक केंद्रातील सेवेकरी भाविक, आरोग्यसेवा देण्यासाठी सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चे डॉ शेवाळे, डॉ जयेश पाटील, डॉ राघवेंद्र राजेश्वरकर, डॉ महेश काळे, डॉ संभाजी लोंढे डॉ सौ विजया दुलांगे इत्यादी उपस्थित होते. तसेच माजलगाव शहरातील डॉ सुशील लोढा, डॉ प्रवीण वारकरी, डॉ संदीप नाटकर, डॉ अशोक घुबडे, डॉ गोळेकर, डॉ शशील



पाचपोर, पत्रकार बांधव, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तसेच श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवाराने परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आरोग्य दुत बीड जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे यांनी केले.

# गावखेडे,ग्रामीण भारताचे स्वप्न अपूर्ण तर शेतकऱ्यांचे प्रश्न कधी सुटणार ?

## खा.रजनीताई पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल



केज दि १२ (प्रतिनिधी) ग्रामीण भागातील जनता बेरोजगारी, महागाईने होरपळून निघत आहे. शेतकरी संकटाशी लढत आहेत ग्रामीण विकास मंत्रालयाने घोषणा केलेला अर्थसंकल्प कुचकामी आहे. घोषणा आणि वस्तुस्थिती यामध्ये खूप मोठे अंतर आहे. यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार आहेत काय ? असा घणाघात काँग्रेसच्या खा. रजनीताई अशोकराव पाटील यांनी राज्यसभेत केला.ग्रामीण भागातील जनता बेरोजगारी, महागाईने होरपळून निघत आहे. शेतकरी संकटाशी लढत आहेत ग्रामीण विकास मंत्रालयाने घोषणा केलेला अर्थसंकल्प कुचकामी आहे. घोषणा आणि वस्तुस्थिती यामध्ये खूप मोठे अंतर आहे. यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार आहेत काय ? असा घणाघात काँग्रेसच्या खा. रजनीताई अशोकराव पाटील यांनी राज्यसभेत केला.अर्थसंकल्पात ४% वाढ केल्यामुळे ग्रामीण भारताचे स्वप्न पूर्ण होणार आहे का ? गाव हा भारताचा आत्मा आहे गाव विकसित झाले नाहीत तर विकासाचा दावा हा पोकळ आहे.विकासाचा पाऊल उचलल्याचा सरकार दावा करत असले तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळी आहे. या वाढीव अर्थसंकल्पाने शेतमजूर, शेतकरी, बेरोजगार यांचे प्रश्न सुटणार आहेत काय असा सवाल उपस्थित केला. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे नाव बदलून जी रामजी केले मात्र हा कायदा रोजगार उपलब्ध करून देणार आहे काय असा प्रश्न उपस्थित केला. ग्रामीण जनतेसाठी आवश्यक असणाऱ्या योजनांमध्ये निधीत वाढ होण्याऐवजी कमी होत आहे ही बाब गंभीर असल्याचा निर्वाळा दिला.

# आईच्या स्मृति प्रित्यर्थ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



चिंचोली माळी दि १२(प्रतिनिधी) -येथून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या व केज तालुक्यातील बोरगाव (बु) येथील स्व. रेखा भगवान गोदाम यांच्या स्मृति प्रीत्यर्थ त्यांचे जेष्ठ चिरंजीव धनंजय गोदाम व सून सोनल गोदाम या दांम्पत्याने जिल्हा परिषद शाळा बोरगाव (बु) येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करून आईच्या स्मृतींना अभिवादन केले.स्व. रेखा गोदाम यांनी प्राथमिक शिक्षण याच शाळेत घेतले होते. त्यांच्या स्मरणार्थ गेल्या चार वर्षांपासून धनंजय व सोनल गोदाम हे दांपत्य मुंबई-खारघर येथून दरवर्षी हा स्तुत्य उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या आदर्श उपक्रमाबद्दल शाळेचे शिक्षक, ग्रामस्थ तसेच नातेवाईकांनी गोदाम दांपत्याचे कौतुक केले. यावेळी बन्सी अप्पा आरकडे, संग्राम आरकडे, विजय आरकडे, भैय्यासाहेब आरकडे, प्रभावती आरकडे, मनिषा आरकडे, स्मिता आरकडे, जयश्री गायकवाड, सरिता आरकडे, जया आरकडे, शाळेचे मुख्याध्यापक देशमुख आर. के. सह शिक्षक यादव बी.एन, जोशी व्ही. बी, सागरे एस. पी, पोपळघट पी. व्ही, कुदळे मॅडम, देखणे मॅडम आदी शिक्षकवृंद यावेळी उपस्थित होते.

# ऑनेस्टी पब्लिक स्कूल येथे महिला दिनानिमित्त स्वावलंबी व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा संपन्न



माजलगाव दि.१२( प्रतिनिधी)- येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल शाखा शिवाजीनगर येथे महिला दिनानिमित्त सौंदर्य व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी डॉ. मानसी देशमुख, डॉ. प्रीती रुद्रवार, प्रिया मालानी, ओम शांती केंद्राच्या अनिता दीदी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उद्देश शाळेच्या प्रिन्सिपल युनिट एक च्या गौरी कानडे यांनी केले. यावेळी उपस्थित माता पालकांना स्वतःच्या आरोग्याची काळजी व प्रतिबंधक लसीकरणाची माहिती डॉ. मानसी देशमुख यांनी दिली. मनुष्याचे आत्मस्वरूप ,व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी व अध्यात्माची जोड द्यावी असे अनिता दीदी यांनी सांगितले. व्यक्तिमत्व विकासामध्ये स्त्रीचे योगदान खूप मोलाचे आहे व श्यामची आई याचा संदर्भ देऊन प्रिया मालानी यांनी प्रतिपादन केले. आकांक्षा नाईकनवरे यांनी सौंदर्य कला प्रात्यक्षिक दाखवून माता पालकांना चांगल्या प्रतीच्या प्रसाधनेची माहिती दिली.. यावेळी शाळेच्या माता पालकांच्या घेण्यात आलेल्या स्पर्धेचे बक्षीस वितरण व कर्तुत्वान महिलांचा सन्मान ऑनेस्टी शाळेच्या संचालिका सौ सत्यभामा वाघ यांच्या उपस्थितीत ब्रह्मकुमारी अनिता दीदी यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षीय समारोप शाळेच्या प्रिन्सिपल अमृता तोर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली यादव यांनी केले तर आभार प्रदर्शन अनुजा गिलानकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक प्रमुख प्रभा हरकळ, सुनिता वैरागे, सुशीला जोशी, मीरा चिंचोलकर, सोनाली नाईकवाडे, जयश्री जाधव, सरिता सोनवणे, सुनिता सोळंके, दीपा शिंदे, श्रुती कुलकर्णी, राजश्री महामुनी , जवकर ताई यांनी कार्य केले.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात स्व.यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



बीड दि १२(प्रतिनिधी):- येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड येथे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती १२ मार्च २०२६ रोजी प्राचार्य डोस शिवानंद क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिमेचे पूजन करून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड येथे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती १२ मार्च २०२६ रोजी प्राचार्य डोस शिवानंद क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिमेचे पूजन करून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर म्हणाले की, यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात.१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर १ मे रोजी त्यांनी पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.पुढील राजकीय कारकिर्दीत उपपंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री,अर्थमंत्री, संरक्षण मंत्री, परराष्ट्रमंत्री हे महत्वपूर्ण पदे भूषवून महाराष्ट्राचे नाव उज्वल केले.सहकार,शेती विषयात देखील त्यांनी भरीव कामगिरी केली आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सय्यद इमाद तर आभार प्रा. दिपक जमदाडे यांनी मानले.यावेळी उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., पर्यवेक्षक प्रा.जालींदर कोळेकर यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रा.विक्रम इनकर यांना पिएचडी पदवी प्रदान



नेकनूर दि १२ (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील नेकनूर येथील प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. विक्रम इनकर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मानव्यविद्याशाखा अंतर्गत 'महाराष्ट्रातील जातीय हिंसाचार एक चिकित्सक अभ्यास' या विषयामध्ये विद्यावाचस्पती ( पीएच.डी ) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना संशोधनासाठी डॉ. सुनिल पिंपळे यांनी मार्गदर्शन केले. यांच्या यशाबद्दल माऊली विद्यापीठ, केज संस्थेचे संस्थापक अध्यक्षअशोकराव पाटील साहेब , संस्थापक सचिव खा. रजनीताई पाटील, संस्थेचे सचिव आदित्यदादा पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रतापराव मोरे सर , नवनाथराव थोटे, श्रीरंग निंबाळकर सर , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ढास डी.के. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व मित्र परिवारांनी त्यांच्या या यशा बाबत अभिनंदन केले व पुढील संशोधन कार्यास शुभेच्छा दिल्या.

## नवगण महाविद्यालयात स्व.यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात

परळी वै. दि १२ (प्रतिनिधी)- येथील नवगण महाविद्यालयात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची जयंती प्राचार्य डॉ आबासाहेब हंगे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बबन मोहिते उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उपस्थित डॉ घुमरे यांनी मनोगत केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.पंडित शिरसाट यांनी केले.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात हिंदी कोर्स प्रमाणपत्राचे वितरण



पाटोदा दि १२ (प्रतिनिधी) - येथील वसंतदादा पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने 'प्रयोजनमूलक हिंदी' हा प्रमाणपत्र कोर्स महाविद्यालीन विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. या प्रमाणपत्र कोर्स मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बळीराम राख व मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. हिंदी विभागाच्या वतीने प्रत्येक शैक्षणिक वर्षात कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्रयोजनमूलक हिंदी' प्रमाणपत्र कोर्स घेण्यात येतो. एक महिना कालावधी असलेल्या या प्रमाणपत्र कोर्स च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सरकारी कार्यालयात हिंदी भाषेचा होत असलेला वापर, कार्यालयीन हिंदी, हिंदी भाषेतील व्यावहारिक शब्द, तांत्रिक क्षेत्रात इंग्रजी भाषेतील शब्दासाठी हिंदी भाषेतील शब्दांचा होत असलेला वापर, राजगारातील संधी, संभाषण कौशल्य विकास या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. 'प्रयोजनमूलक हिंदी' या प्रमाणपत्र कोर्स मध्ये प्रशांत राख, अभिजित सानप, पूजा बडे ,वेदिका देशमाने, शाफिखान पठाण या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.बळीराम राख, डॉ.न.पु. काळे, प्रा.विनोद उगले, प्रा.रवींद्र शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

# राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंतर्गत मुदतीत विकल्प देण्यासाठी शासन निर्णयाची कार्यपद्धतीची अंमलबजावणी करा-उबाळे,चव्हाण

बीड दि १२(प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले सरचिटणीस संजय म्हाळणकर मानद अध्यक्ष नंदकिशोर ठाकूर कार्याध्यक्ष प्रशांत जामोदे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १२ मार्च२०२६ रोजी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांच्यामार्फत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना अंतर्गत अधिकारी कर्मचारी यांना मुदतीत विकल्प देण्यासाठी दिनांक २० सप्टेंबर २०२४ चे शासन निर्णयाची कार्यपद्धती व अंमलबजावणी बाबत शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी बीड जिल्ह्यातील अधिकारी कर्मचारी यांची सामूहिक स्वाक्षरी मोहीम हाती घेण्यात आली. ०१ नोव्हेंबर २००५ पासून सेवेत आलेल्या अधिकारी कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना छझडलागू करण्यात आलेली आहे परंतु सदर योजना लाभदायक नसल्याने अधिकारी कर्मचारी यांच्या संघर्षानंतर सुधारित निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला होता त्यादरम्यानच्या काळात केंद्र शासनाने एकत्रित निवृत्ती वेतन योजनाचा णझड शासन निर्णय प्रसारित केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने NPS / UPS /RNPS या तिन्हीपैकी कोणतीही एक योजना स्वीकारणे बाबत दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत विकल्प दिला होता परंतु महाराष्ट्र शासनाने दिनांक २० सप्टेंबर २०२४ च्या निर्णयानुसार कार्यपद्धती व अंमलबजावणी बाबत शासन निर्णय प्रसारित न केल्यामुळे विकल्पाची मुदत दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत एक वर्षांने वाढवून देण्यात आली होती. एक वर्षाचा अवधी उलटूनही सुधारित निवृत्तीवेतन योजनेची कार्यपद्धती व अंमलबजावणी बाबत शासन निर्णय प्रसारित न केल्यामुळे आम्ही सद्या करणारे खालील कर्मचारी अधिकारी वर्ग विकल्प सादर करणे संदर्भात संभ्रमित आणि गोंधळलेल्या मानसिकतेत आहेत त्याकरता शासनाने दिनांक २० सप्टेंबर २०२४ चा निर्णयाच्या अनुषंगाने विहित कार्यपद्धतीबाबत शासन निर्णय निर्गमित करणेबाबत राज्य सरकारी जिल्हा परिषद निम सरकारी शिक्षक उत्तर कर्मचारी समन्वय समिती महाराष्ट्र यांनी मागील दीड वर्षात वारंवार पाठपुरावा केला आहे. तेव्हा सुधारित वेतन योजना अंतर्गत विहित कार्यपद्धती व अंमलबजावणी बाबत चे शासन निर्णय प्रसारित करण्यात यावी तोपर्यंत विकल्प सादर



करण्यास मुदतवाढ देण्याबाबतची उचित निर्णय व्हावा अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मदेवेंद्र फडणवीस व मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांच्यामार्फत अधिकारी कर्मचारी यांचे सामूहिक स्वाक्षरी मोहीमचे निवेदन देण्यात आलेले आहे असे महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ बीड चे अध्यक्ष बळीराम उबाळे सचिव नंदकिशोर परळकर उपाध्यक्ष अशोक चव्हाण कोषाध्यक्ष उमेश हुलजुते वि.अ.प कल्याणराव शेळकेसहसचिव प्रदीप बनकर तालुका सचिव रामेश्वर गाडगे अशोक पवळ सारंग कांबळे उमेश साळवे दिगंबर घुबडे इत्यादी बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते असे प्रवक्ता चक्रधर हेंद्रे साहेब यांनी प्रसिध्दी पत्रकार द्वारे कळविले आहे.

# दूध भेसळखोरांवर कठोर कारवाईसाठी कायदा मजबूत करा - आ.सुरेश धस

## विधानसभा सभागृहात ठाम मागणी, आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करण्याचा मुद्दाही पटलावर



पाटोदा / महेश बेदरे

**दूध भेसळखोरांवर कठोर कारवाईसाठी कायदा मजबूत करा, अशी ठाम मागणी आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत करत अन्न भेसळ रोखण्यासाठी असलेल्या कायद्यात तातडीने कठोर सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली. अन्नपदार्थांमध्ये, विशेषत: दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या भेसळीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी गुरुवारी (१२ मार्च) अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा गंभीर मुद्दा उपस्थित केला.**

विधानसभा सभागृहात बोलताना धस म्हणाले की, अन्न व भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ मध्ये अस्तित्वात आला. पुढे २००५ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली आणि २०११ पासून तो प्रभावीपणे लागू झाला. मात्र या काळात कायद्यातील अनेक तरतुदी कमकुवत झाल्याने भेसळखोरांवर कायद्याचा धाक उरलेला नाही, अशी टीका त्यांनी केली.या विभागात १९७ पदे भरल्याचे सरकारकडून सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचे धस यांनी सभागृहात नमूद केले. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाकडे फक्त एक किंवा दोनच अधिकारी उपलब्ध असतात. त्यामुळे कुठे भेसळीची घटना घडली तर अधिकारी दुसऱ्या दिवशी घटनास्थळी पोहोचतात, एफआयआर नोंदवायला तिसरा दिवस लागतो आणि तपास प्रक्रियेलाही मोठा विलंब होतो, असे त्यांनी सांगितले.भेसळीचे नमुने तपासणीसाठी पाठवलेल्या प्रयोगशाळांपर्यंतही भेसळखोर पोहोचत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. अनेकदा पॉझिटिव्ह नमुनेही निगेटिव्ह दाखवण्याचे प्रकार होत असल्याच्या तक्रारी येत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.विशेषत: दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याचे धस यांनी सांगितले. मात्र कायद्यातील तरतुदी कमकुवत असल्याने भेसळखोरांना दोन-चार दिवसांत जामीन मिळतो आणि पुन्हा तेच प्रकार सुरू राहतात. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याची गंभीर बाब त्यांनी मांडली.सरकारने दिलेल्या माहितीनुसार १९९ नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी केवळ एकच नमुना पॉझिटिव्ह आढळला आहे. म्हणजेच १९८ नमुने निगेटिव्ह दाखवले गेले. या विभागात मनुष्यबळाची मोठी कमतरता असल्याने इतर विभागांमधील उपलब्ध कर्मचारी अन्न व औषध प्रशासन विभागाकडे वर्ग करण्याची मागणीही त्यांनी केली. तसेच भेसळखोरांवर कठोर कारवाई करण्यासाठी कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याची मागणी त्यांनी केली.यावर उत्तर देताना संबंधित खात्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले की, अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक पाऊल उचलेल.

### आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कठोर शिक्षा हवी - धस

भेसळ करून लोकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोरातील कठोर कारवाई झाली पाहिजे. भविष्यात कोणीही नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचे धाडस करणार नाही, यासाठी अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा अधिक कठोर करणे अत्यावश्यक आहे, असे आमदार सुरेश धस यांनी सभागृहात ठामपणे सांगितले.

# पुरुषोत्तमपुरीत हिंदू-मुस्लिम एकोप्यासाठी इफ्तार पार्टी

## - उपसभापती श्रीहरी मोरे यांचा पुढाकार



माजलगाव (प्रतिनिधी) : तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सामाजिक सलोखा जपण्याच्या उद्देशाने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुस्लिम समाज बांधवांना फळांचे वाटप करण्यात आले.

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या इफ्तार पार्टीत हिंदू व मुस्लिम समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रोजा सोडण्याच्या वेळी सर्वांनी एकत्रितपणे इफ्तार करून बंधुभाव आणि एकोप्याचा संदेश दिला तर समाज बांधवांना विविध प्रकारच्या फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना उपसभापती श्रीहरी मोरे म्हणाले की, समाजात शांतता, बंधुभाव आणि एकता टिकून राहणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे विविध समाजातील लोक एकत्र येतात आणि परस्परांतील प्रेम व विश्वास अधिक दृढ होतो. कार्यक्रमाला पुरुषोत्तमपुरी चे सरपंच अशोक धिरडे, दत्ता शिंदे, रघुनाथ शेळके, भाऊराव धिरडे, शिवाजी गोळेकर, गोरख गोळेकर, शेख मिट्टू, शेख मुज्जू, शेख हमीद, शेख सलीम, शेख राजू, धर्मा मोरे, राहुल मोरे, दिगंबर शेळके, प्रभाकर गायकवाड, डॉ. राजेभाऊ आळणे, वाल्मीक शेळक, शेख रज्जू टेलर, दशरथ राऊत, रामेश्वर घायाळ, नितीन पोळ, राहुल मोरे, सुरज मोरे, समाधान मोरे, राम तोर, दादा पवार यांच्यासह सर्व मुस्लिम समाज बांधव व गावातील स्थानिक नागरिक, मुस्लिम बांधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाजात सौहार्दाचे वातावरण कायम ठेवण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या इफ्तार पार्टीच्या माध्यमातून पुरुषोत्तमपुरी येथे हिंदू-मुस्लिम ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

# हॉटेलमध्ये घरगुती गॅस वापरल्यास थेट गुन्हा दाखल होणार

## - तहसीलदार दत्तात्रय निलावाड



पाटोदा (प्रतिनिधी) : आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅसची टंचाई निर्माण होऊ नये आणि नागरिकांना नियमित गॅस पुरवठा सुरळीत राहावा यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार गुरुवारी पाटोदा शहरात तहसीलदार दत्तात्रय निलावाड व नायब तहसीलदार अभयकुमार जोशी यांनी गॅस एजन्सी तसेच काही हॉटेल्सवर जाऊन पाहणी केली.

यावेळी हॉटेल व्यावसायिकांनी कोणत्याही परिस्थितीत घरगुती गॅस सिलिंडरचा वापर करू नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. गॅसची साठवणूक, गैरवापर किंवा हॉटेलमध्ये घरगुती गॅसचा वापर करताना आढळल्यास संबंधितांवर थेट गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांनी दिला. प्रशासनाच्या या पाहणीमुळे शहरातील गॅस वितरण व वापरावर लक्ष ठेवले जाणार असून घरगुती ग्राहकांना नियमित पुरवठा मिळावा यासाठी कडक उपाययोजना केल्या जात असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# अंमळनेर,कुसळंब भागातील नागरिकांना फसवणाऱ्या पन्हाळकरच्या पोलीसांनी मुसक्या आवळल्या



अमळनेर (प्रतिनिधी) : अमळनेर कुसळंब परिसरातील सामान्य नागरिकांना फोन करून योजनेचा लाभ देतो असं म्हणुन पैसे घेऊन फसवणूक करणाऱ्या गोरक्षनाथ पन्हाळकर उर्फ महाराज यांच्या मुसक्या अंमळनेर पोलीस स्टेशनचे ए पी आय सपकाळ साहेब यांनी आवळल्या बदल सत्कार करण्यात आला आहे.

अमळनेर पिपंळवंडी कुसळंब परिसरातील सामान्य नागरिकांना महिला भगिनींना गोरक्षनाथ महाराज पन्हाळकर हा तोतया फोन करून तुम्हाला शिलाई मशिन भांड्याची पेटी इत्यादी वस्तू मंजूर झाल्या आहेत तुमच्या वस्तू पोहच करण्यासाठी ट्रान्सपोर्टचा खर्च २२०० रु फोन पे किंवा स्कॅनरवर टाका वस्तू पोहच होतील घरी अशा पध्दतीने तो महिलांना फोन करून फसवत होता या बाबतीत अनेक महिलांनी माऊली आप्पा जरांगे यांना हि वस्तुस्थिती सांगितली लगेच माऊली आप्पा जरांगे यांनी सर्वांना पोलीस ठाण्यात अंमळनेर ला बोलावून घेतले व रितसर तक्रार दाखल करायला सांगितले पोलीस ठाण्याचे प्रमुख भागव सपकाळ साहेब यांनी गुन्हा दाखल करुन घेतला या आरोपीचा काहीच पुरावा सापडत नव्हता तो शोधून काढण कठीण होते डि वाय एस पी हानपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एल सी बी पी आय यांच्या सहकार्याने अमंळनेर पोलीस ठाण्याचे ए पी आय भाग्व सपकाळ साहेब यांनी कृषा चव्हाण पी एस आय योगेश बहिरवाळ पोलीस, दिलीप घोशीर,पुजा तिपटे,शितल पवळ, यांची टिम तयार करून त्याचा तब्बल २० दिवस पाठपुरावा करून शोध मोहीम गतीमान केली अखेर जालना जिल्ह्यातील एका छोट्या गावात तो सापडला आणि त्याला पाटोदा कोर्टात हजर केला या आरोपीला पकडण्यासाठी बबन शिंदे, विलास माळी,भारत राठोड,सतिष तरटे,शाम खाडे, संतोष कसाब, गणेश गोसावी,मारुती म्हेत्रे, शत्रुघ्न तिपटे यांनी सहकार्य केले या गुन्ह्याची कबुली आरोपी गोरक्षनाथ पन्हाळकर उर्फ महाराज याने दिली व सर्व रॅकेट उघडकीस आणले त्याच्याकडे सर्व लाडक्या बहिणींच्या याद्या मिळुन आल्या तसेच शेतकऱ्यांना सोलार पंप योजना मंजूर झालेली यादी असा त्याचा उद्योग जोरात चालू होता परंतु अंमळनेर पोलीसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या म्हणून आ सुरेश आण्णा धस प्रतिष्ठानच्या वतीने सपकाळ साहेब व त्यांच्या टीमचा सत्कार करण्यात आला यावेळी माऊली आप्पा जरांगे,आशोक जेधे सरपंच, उध्दव शेठ पवार, महेश खेगरे, दादासाहेब पवार,बंडु आण्णा पवार, अशोक पवार,आमोल पोकळे, देविदास कापसे, शाम दहिफळे,आशोक गुजर,बापु पवार,सह आदी उपस्थित होते

# मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी केला कु.आर्या अंकुश पांचाळचा सत्कार



मुंबई (प्रतिनिधी )मुंबई शहरात शिवकालीन मर्दानी स्पोर्ट मध्ये स्टेट लेवल नॅशनल गोल्ड मेड लिस्ट शिरूर कासार तालुक्यातील खालापूरी येथील व सध्या मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले अंकुश मुंजाबा पांचाळ यांच्या कुमारी आर्या अंकुश पांचाळ हिने घवघवीत यश मिळवून मिडल मिळवले त्यामुळे तिचा मुंबईच्या पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी ट्रॉफी देऊन सत्कार करून विशेषतः गौरविले बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील या छोट्याशा मुलीने यश संपादन केल्याने शिरूर कासार तालुका सह जिल्ह्यात तिचे सर्वत्र कौतुक होत आहे

# सिरसदेवीत लाइनमन खरात यांच्यामुळे मिटर धारकांना त्रास तर अकड्या वाल्याना सूट

सिरसदेवी दि १२ (प्रतिनिधी) : गेवराई तालुक्यातील सिरसदेवी या गावात लाईन मन खरात यांचा मनमानी कारभार चालू असून त्यांच्यामुळे मिटर धारकांना त्रास तर आकड्या वाल्याना खुलेआम सूट दिली जात असल्याचे उघडकीस आले आहे.

सविस्तर माहिती अशी कि, सिरस देवीचे लाईनमन यांनी मीटर तारखांना कसलीही सूचना न देता दिनांक १२ मार्च२०२६ गुरुवार रोजी त्यांचे विज कनेक्शन कट केले आहे यामुळे मिटर धारकांमध्ये लाइनमन खरात यांच्या विरोधात रोष निर्माण झाला आहे. विद्युत अधिनियम २००३ चे कलम ५६ नुसार प्रत्येक मिटर धारकांचे बिल जर थकीत झाले असेल आणि ते वेळेवर भरले नाही तर त्यांना विज मिटर कनेक्शन कट करण्याच्या अगोदर नोटीस देणे बंधनकारक आहे जर नोटीस देऊन सुद्धा मिटर धारकांने १५ दिवसाच्या आत बिल भरले नाही तर विज कनेक्शन कट केले जाऊ शकते परंतु लाइनमन खरात यांच्याकडून कसल्याही प्रकारची नोटीस मिटर धारकांना न देता सिरसदेवी गावामध्ये मिटर धारकांचे विज कनेक्शन तोडले जात आहे . सिरसदेवी गावात आकडे धारक बऱ्याच पैकी आहेत याच्यावर कारवाई करण्यास सांगितलं तर उलट खरात म्हणतात ते आम्हांला माहिती नाही, आम्हाला आकडे दिसत नाहीत, आमचे कर्मचारी आल्यावर आम्ही बघू, आमच्या वरिष्टानी आम्हांला सांगितल्यावर आम्ही कारवाई करू असे बेजबाबदार उत्तर नागरिकांना देतात यामुळे अश्या मनमानी करणाऱ्या लाइनमन खरात यांच्यावर निलंबण केले पाहिजे अशी मागणी सिरसदेवी नागरिकांमधून आणि मिटर धारकांमधून होत आहे.

## आयएमए तर्फे बीड न.प.कर्मचाऱ्यांसाठी

# मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद



बीड दि.१२ (प्रतिनिधी) : इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) व डब्ल्यूडीडब्ल्यू, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड नगर परिषद, कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक व मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी आयएमए बीड'चे अध्यक्ष डॉ.अनंत मुळे, सचिव डॉ. अमोल गीते तसेच महिला विंगच्या अध्यक्षा डॉ.सुनीता बारकुल, डॉ. उषा काळे, डॉ.जयश्री घुगे आदींची उपस्थिती होती. शिबिरामध्ये डॉ. पौर्णिमा येन्दे, डॉ. संजीवनी कोटेचा, डॉ. सीमा जोशी, डॉ. सारिका वाघ, डॉ. अंजली बहीर, डॉ. उज्वला शिंदे, डॉ. अनुपम जेथलिया, डॉ. सुषमा खोसे व डॉ. अबोली पैठणकर या महिला डॉक्टरांनी आरोग्य सेवा दिली.

शिबिरामध्ये नगर परिषद कर्मचाऱ्यांची रक्तदाब, मधुमेह, रक्त तपासणी तसेच इतर आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करून नियमित तपासणीचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमामुळे नगर परिषद कर्मचाऱ्यांना आपल्या आरोग्याची तपासणी करून घेण्याची संधी मिळाली. उपस्थितांनी आयएमए बीड व डब्ल्यूडब्ल्यू बीड यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.


### जाहीर प्रगटन
### (वारस प्रमाणपत्रा बद्दल )

**श्री.आर.बी.पोळ, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माजलगांव यांच्या न्यायालयात.**

(मार्फत विधिज्ञ :- श्री.ए.बी.गाडेकर) कि. दि. अर्ज नंबर ९५/२०२४

**अर्जदार :** १) अजीजोद्दीन सैफोद्दीन इनामदार, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा.पात्रुड ता. माजलगांव जि. बीड. २) मुस्तफा शैफोद्दीन उर्फ सैफोद्दीन इनामदार, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ३)शेख उर्फ इनामदार नुरजहा सैफोद्दीन, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. सदर

विरुध्द

**गैरअर्जदार :** १) गौसियाबी भ्र. मैनोद्दीन सय्यद, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. नित्रुड ता. माजलगांव जि.बीड. २) नाजेमा भ्र.रसुल शेख, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. फुलेपिंपळगांव ता. माजलगांव जि. बीड

**प्रकरण :** मुंबई नियमन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **शैफोद्दीन पि. गफुरोद्दीन इनामदार** हे/या **दि.०३/१२/२०२३ रोजी पात्रुड ता. माजलगांव जि. बीड** येथे मयत झाले/झाल्या आणि त्यांचे वरीलप्रमाणे वारस अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे. म्हणणे आहे.

अर्जदार / गैरअर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांचे अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, त्यांना शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार/ गैरअर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणांस समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक : १२/०३/२०२६ रोजी माझी स्वाक्षरी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **पुढील तारीख :- १३/०४/२०२६.**

आदेशावरून,
**अधिक्षक**
क.लिपीक
दिवाणी न्यायालय व.स्तर,माजलगांव



### कागदपत्र हरवले आहे

**नाव : श्रीपाद अनिलराव जोशी**

हरवलेले कागदपत्र : डि.एड. प्रमाणपत्र. बीड-पाटोदा प्रवासा दरम्यान हरवले आहे. कागदपत्र सापडल्यानंतर संपर्कासाठी पत्ता : मु.पो.पाटोदा, घर क्र.३११३ , ता. पाटोदा जि. बीड. मो.९३७०५३४८०५



### जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वरे कळविण्यात येते की, मौजे गवळवाडी ता.जि. बीड येथील गट क्र. ५७६ मधील बीड येथील अति. जिल्हा व सत्र न्यायालयात नियमित दिवाणी अपील क्र. १४/२०२३ हे न्यायप्रविष्ठ असुन त्यामधील अपीलकार कलाबाई नाईकवाडे यांनी वाद मिळकतीवरील क्षेत्रफळ त्या दाव्यातील उत्तरवादी हेमराज कचरुलाल समदरया हे वाद मिळकत न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत असतांना विक्री करण्याचे विचारात असुन माझे अशीलाचे परस्पर तिचे नुकसान व्हावे म्हणुन सदरचे कृत्य असल्यामुळे कोणीही उपरोक्त जमीनी विषयी कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार करु नये, असा जर कोणी व्यवहार केला तर त्याची जबाबदारी आमचेवर राहणार नाही.

करीता हे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

ठिकाण: बीड
दिनांक: १२/०३/२०२६

मार्फत
**ॲड.एस.पी.लघाने**
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.९९६०५६१९६८

जाहिर प्रगटन देणार
**कलाबाई रावसाहेब नाईकवाडे**


# मौजे पाली येथील पीएम श्री जि.प.माध्यमिक शाळेत आंतरराष्ट्रीय व्याख्यानाचे आयोजन




बीड (प्रतिनिधी) : मौजे पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत राष्ट्रीय आविष्कार अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विज्ञान आणि अध्यात्म या विषयावर आंतरराष्ट्रीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, माउंट आबू येथील संचालिका राजयोगिनी बीके प्रज्ञा दीदी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक लाड सर होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागताने करण्यात आली. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बीके प्रज्ञा दीदी यांनी विज्ञान आणि अध्यात्म यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम स्पष्ट केला. आधुनिक विज्ञानामुळे मानवी जीवनात अनेक सोयीसुविधा निर्माण झाल्या असल्या तरी मानसिक शांतता, सकारात्मक विचार आणि नैतिक मूल्ये जपण्यासाठी अध्यात्माची आवश्यकता तितकीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी उषा बहिणजी, मिसाळ सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमासाठी शाळेतील काब्दे मॅडम, म्हेत्रे मॅडम, हंगे मॅडम, खाडे मॅडम, जाधव मॅडम, सोनवणे मॅडम, वाकचौरे मॅडम, सांगळे मॅडम तसेच पायके सर, आघाव सर, राठोड सर, तळेकर सर, सोळुंके सर, साबळे सर, डोंगर सर आदी शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारून विषय अधिक समजून घेतला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन मनीषा मुंडे यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राजेंद्र राठोड सर यांनी व्यक्त केले. या प्रेरणादायी व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानासोबतच अध्यात्माचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली असून त्यांच्या वैचारिक विकासाला निश्चितच चालना मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पार्श्वभूमी

दि.१३ मार्च २०२६ शुक्रवार


## श्रीमती पुष्पा जाधव यांना पीएच.डी.प्रदान

बीड : येथील बलभीम महाविद्यालयातील मराठी विभागाच्या संशोधन केंद्रात



पीएच .डी. पदवीसाठी अभ्यास करणाऱ्या श्रीमती पुष्पा भीमराव जाधव यांना नुकतीच डॉ. बा . आं . मराठवाडा विद्यापीठाने पीएच .डी . ही पदवी बहाल केली आहे . त्यांनी कवी निरंजन रघुनाथ आणि समकालीन कवींच्या काव्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन केले होते . त्यांना पदवी व पदव्युत्तर मराठी

पान २ वर

## जीवाचीवाडी येथील आरोग्य उपकेंद्र आठ दिवसापासुन बंद

केज दि १२ (प्रतिनिधी) - तालुक्यातील जीवाची वाडी येथील आरोग्य उपकेंद्र दि.६ मार्च२०२६ पासुन कायम बंद असल्याने ग्रामस्थांनी अधिक्षक प्राथमिक आरोग्य उप केंद्र विडा यांच्याकडे तक्रार केली आहे. दरम्यान संबंधित अधिकारी वैद्यकीय रजेवर गेल्याचे कारण पुढे आले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, जीवाचीवाडी येथे युनानी दवाखाना आहे. तेथील कर्मचारी जागा भरल्या नाहीत एक

पान २ वर

### वकिलांच्या समस्येची आ.सुरेश धस यांच्याकडून थेट दखल

# स्टॅम्प तिकिटांसदर्भात उपकोषागाराला तातडीने साठा उपलब्ध करण्याचे पत्राद्वारे निर्देश ; सोमवारपासून प्रत्यक्ष वितरण सुरू होणार

**पाटोदा दि.१२(प्रतिनिधी):– पाटोदा शहरात मागील पाच ते सहा महिन्यांपासून पाच रुपयांचे न्यायालयीन शुल्क मुद्रांक तिकीट उपलब्ध नसल्याने न्यायालयीन कामकाजात मोठे अडथळे निर्माण झाले होते. त्यातच दहा रुपयांच्या तिकिटांचाही साठा नुकताच संपल्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली होती. वकील व पक्षकारांना दररोज अडचणींचा सामना करावा लागत असताना या गंभीर प्रश्नाची आ.सुरेश धस यांनी थेट दखल घेत या संदर्भात आपले पीए सोमीनाथ कोल्हे यांच्यामार्फत उपकोशागार कार्यालयाला गुरुवारी पत्र दिले प्रशासनात तातडीच्या हालचाली सुरू झाल्या असून येत्या सोमवारी पाच व दहा रुपयांच्या तिकिटांचे वितरण सुरू होणार असल्याची माहिती समोर आली आहे.**

न्यायालयीन कामकाजात आरोपींच्या हजेरीमाफीचे अर्ज, जामीन अर्ज, स्टेप्स अर्ज, प्रतिज्ञापत्रे, तक्रार अर्ज तसेच इतर विविध कागदपत्रांसाठी न्यायालयीन शुल्क मुद्रांक लावणे आवश्यक असते. पाच व दहा रुपयांची तिकिटे सर्वाधिक वापरली जात असल्याने त्यांचा अभाव प्रकर्षाने जाणवत होता. सध्या एक व दोन रुपयांची तिकिटे उपलब्ध असली तरी आवश्यक रकमेपुरती मोठ्या संख्येने तिकिटे लावावी लागत असल्याने अर्जांवर अतिरिक्त जागा व्यापली जात होती, कागदपत्रे विस्कळीत होत होती आणि कामकाजात विलंब होत असल्याची चर्चा विधिज्ञ वर्तुळात सुरू होती.

दरम्यान, या प्रश्नाकडे आ.सुरेश धस यांनी लक्ष घालावे, अशी मागणी पाटोदा पत्रकार संघाचे सचिव ड. महेश बेदरे यांनी आमदारांकडे केली होती. तसेच वकील संघाच्या वतीने ॲड.जब्बार पठाण यांनीही उपकोषागार कार्यालयाकडे तातडीने तिकिटांचा साठा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. वकील बांधवांची अडचण लक्षात घेऊन आमदार धस यांनी बुधवारीच या प्रश्नावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

त्या अनुषंगाने गुरुवार, १२ मार्च रोजी आ.सुरेश धस यांच्या लेटरहेडवरून

पान २ वर

### आ.प्रकाशदादा यांची विधानसभेत मागणी

## गडकोट विकास महामंडळ स्थापन करा

माजलगाव दि १२ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राची भूमी ही



छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाने पावन झालेली आहे. स्वराज्य स्थापनेसाठी असंख्य मावळ्यांनी दिलेल्या बलिदानाची साक्ष देणारे गड-किल्ले आज जीर्ण अवस्थेत असून त्यांचे तातडीने संवर्धन करणे गरजेचे आहे, असे मत माजलगाव मतदारसंघाचे आ.प्रकाशदादा सोळंके यांनी विधानसभेत मांडले. महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड-किल्ले हे राज्याच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतीक आहेत. मात्र सध्या अनेक गड-किल्ल्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून योग्य संवर्धन व जतन न झाल्यास भावी पिढीला आपल्या इतिहासाची खरी ओळख होणार नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने गड-किल्ल्यांच्या जतन व विकासासाठी गडकोट विकास महामंडळ स्थापन करावे, अशी मागणीही त्यांनी केली. गड-किल्ल्यांचे संरक्षण, विकास, पर्यटनवाढ आणि ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, गड-किल्ले संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या जागर प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी या मागणीसाठी ५ मार्चपासून उपोषण सुरू केले आहे.

पान २ वर

## पहाटेच्या पाऱ्यात बीडशहर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

### जुगाऱ्यांकडून २ लाख १८ हजारचा मुद्देमाल जप्त

बीड दि १२ (प्रतिनिधी)- बीड शहरातील किल्ला मैदान परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पहाटेच्या सुमारास शहर पोलिसांनी धाड टाकून दहा जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून मोबाईल, रोख रक्कम व इतर साहित्य असा एकूण २ लाख १८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार बीड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या किल्ला मैदान येथील परिसरातील मोकळ्या जागेत 'तिर्रट' नावाचा जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. बल्लाळ यांच्या पथकाने गुरुवारी पहाटे १.१५ वाजण्याच्या सुमारास त्या ठिकाणी छापा टाकला. पोलिसांनी आरोपींकडून मोबाईल फोन, रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा २ लाख १८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ राख

पान २ वर

## कड्यात मोहटादेवी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह

कडा दि.१२(प्रतिनिधी):- येथील मोहटादेवी मंदिर येथे मंदिराच्या ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त १६ ते २३ मार्च या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह आणि सकल संत चरित्र कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कडा येथील पेट्रोल पंप परिसरात असलेल्या मोहटादेवी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. शनिवार, १४मार्च २०२६ रोजी मोहटादेवी मंदिर, कडा येथून पायी पालखी दिंडी निघेल. ही दिंडी रात्री माणिकदौंडी येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी मोहटादेवी गड (पाथर्डी) येथे दर्शन करून कडा येथे परत येईल. सोमवार, १६ मार्च रोजी

पान २ वर

## दिव्यांगांनी अनुदान सुरक्षिततेसाठी युडीआयडीला ई-आधार जोडावे - जे.डी.शाह

बीड - जिल्ह्यातील शारिरीक दृष्ट्या दिव्यांग असलेल्या



(अपंग) बांधवांनी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने दिले जाणारे वाढीव अनुदान रुपये अडीच हजार रुपये पदरात पाडून घेण्यासाठी तहसील कार्यालयात आपले कागद पत्रांतील तुरटी दुरुस्ती करून ही ज्यांना अद्याप पर्यंत वाढीव अनुदान मिळाले नाही अशा दिव्यांगांनी तात्काळ आपल्या जवळच्या तहसील कार्यालयात जाऊन आपले युडीआयडी कार्डाला ऑनलाईन टक्केवारी प्रमाणपत्र तसेच ई-आधार कार्ड संलग्न करून घ्यावे न केल्यास वाढीव अनुदान मिळणार नाही असे आवाहन समाजसेवक जे.डी.शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना

पान २ वर

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न सरकारने दिलेला शब्द पाळावा–भाई थावरे

माजलगांव दि.१२ (प्रतिनिधी):- सन २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्या वेळी सभागृहात शेतकऱ्यांना सरसगट हेक्टरी १७,००० विमा देण्याची घोषणा मुख्यमंत्री साहेबांनी केली होती. परंतु आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही जमा झालेला नाही. घोषणा मोठ्या-मोठ्या केल्या जातात, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासनाची गती का कमी पडते ? हा प्रश्न आज प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ जिल्हाधिकारी



साहेबांमार्फत मुख्यमंत्री साहेबांना निवेदन देणार आहे. शेतकऱ्यांना जाहीर केलेले हेक्टरी १७००० विम्याचा लाभ तात्काळ देण्यात यावा. जर लवकरात लवकर शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळाला नाही, तर भाई गंगाभीषण थावरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने बीड जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत समोर लाक्षणिक आंदोलन छेडण्यात येईल. शेतकऱ्यांच्या घामाचा आणि अश्रूंचा हिशोब सरकारने द्यावाच लागेल असे भाई गंगाभीषण थावरे यांनी म्हटले आहे.

## पिंपळनेर परिसरात लिंबूची मागणी वाढली

पिंपळनेर दि.१२(प्रतिनिधी):- उन्हाचा तडाखा वाढू लागल्याने आता किरकोळ बाजारात लिंबूची मागणी चांगलीच वाढली आहे. या मागणीच्या तुलनेत लिंबाची आवक मर्यादित होत असल्याने लिंबूचे दर वाढले असून सध्या किरकोळ बाजारात २ लिंबूसाठी ग्राहकाला १० रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे आता किरकोळ बाजारात लिंबू भाव खाताना दिसत आहे. दरम्यान, पावसाळा सुरू होईपर्यंत लिंबाचे दर चढेच राहणार असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.

गेल्या तीन आठवड्यांपासून तापमानात कमालीची वाढ जाणवत आहे. होळी झाल्यावर तर उन्हाचा तडाखा आणखीनच वाढला आहे. पुढील दोन महिन्यांत वातावरणातील तापमान आणखीन वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाढणाऱ्या उष्णतेने बाजारात थंड सरबते,

पान २ वर

## सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेने केली आत्महत्या

बीड दि १२ (प्रतिनिधी) -भक्तीला तीन मुली झाल्या तेव्हा दुसऱ्या लग्नास परवानगी देत नाही या कारणावरून गेली अडीच वर्षापासून सासरच्या लोकांकडून होत असलेल्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना घडली.

या संदर्भात सूत्राकडून मिळालेले माहितीनुसार तीन मुली झाल्यामुळे मुलगा होण्यासाठी नवऱ्याला दुसरे लग्न करण्यासाठी संमती द्यावी, यासाठी तिला वारंवार मारहाण करून एका बाँड पेपरवर लिहून देण्याची सक्ती केली जात असल्याचे तक्रारीत म्हटले आह. भक्ती अमोल कोरडे असे मृत विवाहितेचे नाव असून, याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात

पान २ वर

## माजलगाव नगर परिषदेची कर वसुली मोहीम जोरात सुरू

माजलगाव दि.१२(प्रतिनिधी) :- माजलगाव नगरपरिषदे कडून मार्च एंड ची शहरात करवसुली मोहीम जोरात सुरू असून कर्मचाऱ्यांनी एक रकमे रक्कम भरणारे व्यापारी महेश कुमार मालपाणी यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत. माजलगाव नगरपरिषदेमध्ये गेल्या चार-पाच वर्षांपासून प्रशासक होते परंतु आता नव्याने नगर परिषदेमध्ये आलेल्या नगराध्यक्ष नगरसेवकांनी च्या बॉडी कडून शहरांमध्ये नळाची घर भाडे दुकान भाडे अशा विविध कराची वसुली मोहीम जोरात सुरू आहे हे कर्मचारी दारोदारी जाऊन वसुली करत आहेत अशीच वसुली करत असताना या प्रतिष्ठित व्यापारी महेश कुमार

### महेश कुमार मालपाणी यांनी एक रक्कमी रक्कम भरणा केल्याबद्दल केला सत्कार



महाराणी यांनी त्यांच्याकडील मालमत्ता कर एक लाख ९१ हजार २४९ रुपये मार्च २६ पर्यंत एक रकमे भरणा केला आहे म्हणून नगरपरिषदेचे कर्मचारी आयुब भाई पठाण रवींद्र साळुंखे महेश धर्माधिकारी शेख अहमद शेख माझे सुमित साळवे चंद्रकांत बुलबुले रंजीत यांनी महेश कुमार मालपाणी यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत व कर भरण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देऊन कर्मचारी वसुली करताना दिसून येत आहेत.

## गायक राज रायते यांचा तेली समाज रत्न पुरस्काराने गौरव

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- श्री संत संताजी जगनाडे महाराज तेली समाज जनसेवा बहुउद्देशीय संस्था, (जामनेर) जळगाव संस्थापक अध्यक्ष अजय चौधरी व सर्व तेली समाज बांधव यांच्यावतीने गायक राज प्रल्हादराव रायते यांना तेली समाज रत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला. श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित असलेले गीतांचे गायक राज प्रल्हादराव रायते यांनी आपल्या मधुर आवाजातून संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर भारतात एक वेगळी ओळख निर्माण करत आहे. तेली समाजाचे अभिमान असणारे राज रायते यांना नुकतेच छत्रपती संभाजीनगर येथे तेली समाज भूषण पुरस्काराने



गौरवल्यानंतर , संताजी जगनाडे महाराज तेली समाज जनसेवा बहुउद्देशीय संस्था. यांच्यावतीने तेली समाज रत्न पुरस्कार जाहीर करून

पान २ वर

## गुरव समाजाचा मुंबईत १७ मार्चला मोर्चा

बीड दि.१२(प्रतिनिधी):- अखिल गुरव समाजा संघटनेचे नेतृत्वाखाली सखल गुरव समाजाचे वर्षानुवर्षी प्रलंबित न्याय हक्काच्या पूर्ततेसाठी मंगळवारी १७ मार्च २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे यामध्ये राज्यभरातून समाज बांधव सहभागी होणार आहे असे गुरव समाज संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष संजय कल्याणराव गुरव यांनी माहिती प्रसिद्ध पत्रकार द्वारे म्हटले आहे. यासंदर्भात जेजुरी येथील बैठकीस आंदोलनाची नीती ठरण्याच्या सोबतच समाजातील लोकप्रतिनिधी जाहीर सत्कार करण्यात आला व संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष एडवोकेट अण्णासाहेब शिंदे व जेजुरी नगरपालिका नगराध्यक्ष जयदीप बार भाई यांच्यानंतर आंदोलन केले



पान २ वर

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी दोघांना १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

### मा.व्ही.एम.पाटवदकर,अति.जिल्हा व सत्र न्यायाधीश १ तथा विशेष न्यायाधीश बीड यांचा महत्वपूर्ण निकाल

बीड दि १२(प्रतिनिधी)- पिडीत अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याचा गुन्हा सिद्ध झाल्यावर जीवन रघुनाथ सरवदे, रा. इंद्रप्रस्त कॉलनी बालेपीर, बीड व आरोपीस गुन्हयात सहकार्य केल्याबद्दल केज येथील कोकोस्को मज्जिद पाठीमागे राहणारी नामे सारीका रामेश्वर भोसले, ह.मु. एकता कॉलनी गणेश नगर शास्त्री चौक भोसरी पुणे यांना व्ही.एच. पाटवदकर, अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश- १ तथा विशेष न्यायाधीश, बीड यांनी दोषी ठरवून आरोपी नंबर १ यांस १० वर्ष सश्रम कारावास व एकत्रितपणे९ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एकत्रितपणे ९ महिने साधा कारावास व आरोपी नंबर २ हिस १० वर्ष सश्रम कारावास व ३ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास



अशी शिक्षा ठोठावली .

या प्रकरणाची हकिगत अशी की, पिडीता हि तिच्या आई व वडील यांचे सोबत राहते. पिडीता हिचे वडील मिस्तरी काम करतात व त्यांचे सोबत आरोपी नामे जीवन रघुनाथ सरवदे रा. इंद्रप्रस्त कॉलनी बालेपीर, बीड हा त्यांचे सोबत मिस्तरी काम करायचा व पिडीतेचे वडील यांचे सोबत आरोपी हा पिडीता यांचे कधी कधी घरी येत होता. तेव्हा त्याने पिडीतेचा मोबाईल नंबर घेतला व दोघे व्हाटसअप, इस्टाग्राम वरून व फोन करून बोलू लागले. त्यामुळे त्यांची चांगली ओळख झाली होवून मैत्री झाली त्यानंतर मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. आरोपी नंबर १ जीवन सरवदे याने दिनांक २० मे २०२२ रोजी पिडीता हिस दुपारी ०१.३० वाजण्याच्या सुमारास शिवाजी चौक, बीड येथुन ट्रॅव्हल्स मध्ये बसुन अहमदनगर येथे बस स्टॅन्डला गेले व तेथे उतरून त्या ठिकाणा वरून पुण्याचे बस मध्ये बसुन पुणे भोसरी येथे घेऊन गेले. भोसरी येथे आरोपीची बहीणी नामे सारीका रामेश्वर भोसले हिचे घरी गेले. आरोपीची बहीण यांचे घरी १५ दिवस पिडीतास एका रूममध्ये ठांबुन ठेवले व तेथे आरोपी याने तिची इच्छा नसतांना बळजबरीने तिच्याशी शारिरीक संबंध केले.

पान २ वर

## प्रत्येकाने जीवनात येऊन ईश्वराचे नामस्मरण करून जीवन सार्थक करावे

### लवूळ अखंड हरिनाम सप्ताहातून सुरेश महाराज लांडे

लवूळ दि.१२(प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील लवूळ क्रमांक १ येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी एकनाथ षष्ठी दिवशी भव्य आणि दिव्य असा अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झालेला आहे. तिसऱ्या दिवशीच्या आपल्या कीर्तनरुपी सेवेतून सुरेश महाराज लांडे यांनी आजच्या युगात प्रत्येक माणूस श्रीमंत असो की, गरीब असो मात्र तो आपल्या जीवनात सुखी नाही कारण प्रत्येक माणूस ईश्वराचे नामस्मरण न करता आपल्या संसारात जास्त प्रमाणात गुंतलेला असल्यामुळे आणि पैशाच्या मोहात आपण किती पैसे कमवू याचे भान राहिलेले नाही. प्रत्येकाला या पैशाच्या पुढे प्रेमाचे संबंध कमी होत चाललेले आहे. त्यामुळे आजच्या युगात नामस्मरण केले तरच तुम्हाला तुमचे जीवन आनंदीमय व सुख समाधान लाभेल यामध्येच खरे जीवन आहे. या पृथ्वीतलावर अनेक संत, महंत व मोठमोठे महान नेते होऊन गेले. विशेष करून या महाराष्ट्र राज्यात अनेक संत होऊन गेले व आजही आहेत. हे मोठे भाग्य मराठवाड्यालाही लाभलेले आहे. माणसाजवळ कितीही पैसा असला तरी त्याला खरे सुख परमार्थात आहे. त्यामुळे आपल्या आई-वडिलांची सेवा सतत केली तर तुम्हाला कुठेही जाण्याची गरज नाही. या देशात आपल्या काळात काही वर्षांपूर्वी अयोध्येमध्ये राममंदिर भव्य आणि दिव्य असे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी उभारले हे मोठे भाग्य लाभलेले आहे. आज हर घर राम असे वातावरण निर्माण झालेले आहे. प्रत्येकाने या जीवनात येऊन नामस्मरण केले तर नक्कीच त्याचा फायदा तुमच्या जीवनात होतो हे मात्र तितकेच खरे आहे. त्यामुळे प्रत्येक गावोगावी प्रत्येकाने असे अखंड

पान २ वर

CMYK